



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १३३ * नांदेड * बुधवार, दि. २० मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# एनटीएच्या प्रश्नपत्रिका पॅनलमध्ये स्वतःची माणसं घुसवली

## शिवराज मोटेगावकरचा कट सीबीआय चौकशीत उघड




### सीबीआयची टीम लातूरमध्ये डॉक्टरांपर्यंत पोहोचली!

नेट पेपर लिक प्रकरणी सीबीआयची टीम लातूरमध्ये दाखल झाली. त्यानंतर मंगळवारी संध्याकाळी शहरातील एका बालरोग तज्ज्ञ डॉक्टराच्या हॉस्पिटलमध्ये पोहोचली. दोन तासांहून अधिक काळ संबंधित डॉक्टरांची चौकशी सुरू आहे. नीट परीक्षेचा कथित फुटलेला पेपर या डॉक्टरांपर्यंत पोहोचल्याचा संशय सीबीआयला आहे. तसंच संबंधित डॉक्टरांनी पेपर विकत घेतल्याची शक्यता तपासली जात असल्याची माहिती समोर येत आहे.

**पुणे (प्रतिनिधी)–** नीट परीक्षेचा पेपर लिक करण्यासाठी एनटीएच्या प्रश्नपत्रिका पॅनलमध्ये आरसीसीचे संचालक शिवराज मोटेगावकर यांनी स्वतःची माणसं घुसवल्याचे सीबीआय तपासात समोर आले आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणात आरसीसी क्लासचे संचालक शिवराज मोटेगावकरने त्यांच्या साथीदारांच्या मदतीने अत्यंत सुनियोजित कट रचल्याची माहिती सीबीआय तपासातून समोर येत आहे. तपासानुसार, मोटेगावकर यांनी त्यांच्या क्लासमध्ये कार्यरत असलेल्या पी. व्ही. कुलकर्णीची एनटीएच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या पॅनलवर नियुक्ती करून घेतली होती. तसेच मनीषा मांढरेही एनटीए पॅनलवर वर्णी लावण्यात आल्याचे समोर येत आहे. सीबीआयच्या प्राथमिक तपासानुसार कुलकर्णी केमिस्ट्री आणि मांढरे बायॉलॉजीच्या प्रश्नपत्रिका फोडणार आणि मोटेगावकरपर्यंत पोहोच करणार अशी सोय करण्यात आली असा संशय तपास यंत्रणांना आहे. मोटेगावकर यांनी त्यांच्या आर्थिक ताकदीच्या बळावर हे संपूर्ण नेटवर्क उभे केल्याचा संशय सीबीआयला आहे. दरम्यान, नीट व्यवस्थापनातील आणखी कोणी या प्रकरणात सहभागी आहे का, याचाही तपास सीबीआयकडून केला जात आहे.

मोटेगावकर यांनी त्यांच्या क्लासमध्ये कार्यरत असलेल्या पी. व्ही. कुलकर्णीची एनटीएच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या पॅनलवर नियुक्ती करून घेतली होती. तसेच मनीषा मांढरेही एनटीए पॅनलवर वर्णी लावण्यात आल्याचे समोर येत आहे. दोघांनी आपापल्या विषयांचा म्हणजेच कुलकर्णी केमिस्ट्री आणि मांढरे बायॉलॉजीच्या प्रश्नपत्रिका फोडणार आणि मोटेगावकरपर्यंत पोहोच करणार अशी सोय करण्यात आली. त्यानंतर या पेपरच्या आधारे वाढलेल्या गुणातून तो आपले कौतुक करून घेत होता. त्यातून आपल्या क्लासकडे अनेक विद्यार्थ्यांनी आकर्षित व्हावी असं ते करत होता.

एनटीएच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या पॅनलवर त्याने या दोघांची वर्णी कशी लावली, एनटीएमध्ये त्याचं कोणाशी कनेक्शन आहे का? आणखी कोणाचं यामध्ये कनेक्शन आहे का? याचा तपास केला जात आहे, तपासात अनेक लिंक पुढे जात आहे, मोटेगावकरने आपल्या मुलाला देखील तो पेपर दिल्याचा संशय व्यक्त होत आहे. घरात कोणीतरी डॉक्टर असावं का? अशी त्याची तयारी होती का? या अनुषंगाने तपास सुरू आहेत. सीबीआयकडून सर्व अंगाने तपास सुरू आहे.

### शिवराज मोटेगावकरच्या मुलाची चौकशी सुरू

नीट पेपरफुटीचा कट शिवराज मोटेगावकरने त्याच्या साथीदारांना हाताशी धरुन अतिशय सुनियोजितपणे आखल्याचं सीबीआयच्या तपासात समोर येत आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी शिवराज मोटेगावकरच्या तपासात विविध धक्कादायक माहिती समोर येत आहे. शिवराज मोटेगावकर आरसीसी कोचिंग क्लासचा संचालक एनटीएशी निगडीत प्राध्यापकांशी मोटेगावकरचे संबंध होते. पी.व्ही.कुलकर्णीसोबत मोटेगावकरचे घनिष्ठ संबंध आहेत. मोटेगावकरने परीक्षेपूर्वीच प्रश्न मिळवून उत्तरांसह मुलांपर्यंत पोहोचवले. मोटेगावकरच्या मोबाईलमध्ये पेपरफुटीचे अनेक पुरावे मिळाले. त्यानंतर आता शिवराज मोटेगावकरच्या मुलाची देखील सीबीआय कार्यालयात चौकशी सुरू आहे. शिवराज मोटेगावकर याच्या मुलाची पुण्यातील सीबीआय कार्यालयामध्ये चौकशी सुरू आहे, शिवराज मोटेगावकरच्या मुलाने बारावीची परीक्षा दिली आहे आणि, त्यालाही फुटलेल्या नीट प्रश्नपत्रिकाचा फायदा झाल्याचा बोललं जात आहे. शिवराज मोटेगावकरच्या मुलासोबत शिवराज मोटेगावकरच्या आरसीसी क्लासमध्ये शिकणाऱ्या आणखी तीन विद्यार्थ्यांची त्यांच्या पालकांसह सीबीआय ऑफीसमध्ये चौकशी केली जात आहे.

# नांदेड विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची आचारसंहिता लागू

## जिल्हा प्रशासन सज्ज; जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची पत्रकार परिषदेत माहिती



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुसार जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन पूर्णतः सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंगळवार, दि. १९ मे रोजी दुपारी चार वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने उपस्थित होते.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, निवडणुकीची अधिसूचना २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १ जून २०२६ असून, अर्जांची छाननी २ जून रोजी करण्यात येईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

या निवडणुकीसाठी मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार असून, मतमोजणी २२ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील स्थानिक संस्थांच्या सदस्यांमधून या मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. सध्या मतदारसंघात एकूण १७ कार्यरत स्थानिक स्वराज्य संस्था असून, मतदारांची संख्या ४३२ इतकी आहे. अंतिम यादीपर्यंत या संख्येत वाढ होण्याची शक्यता असल्याचे कर्डिले यांनी सांगितले. या निवडणुकीसाठी मतदान केंद्राची संख्या ८ राहणार असून, नांदेड जिल्ह्यातील सर्व उप विभागाच्या मुख्यालयी तहसिल कार्यालयात प्रत्येकी एक मतदान केंद्र राहणार आहे.

यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने यांनी नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ विधान परिषद निवडणूक, मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रम २०२६ बाबत सविस्तर माहिती दिली. मतदार नोंदणी, दुरुस्ती आणि पडताळणी प्रक्रियेबाबत आवश्यक ती कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सर्व संबंधितांना केले. आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता राजकीय पक्ष, स्थानिक संस्था आणि प्रशासनाने घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.



**नांदेड** : शहरात उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे रस्त्यावर शुकशुकाट दिसून येत आहे. (छाया : करणसिंह बैस)

# पेट्रोल-डिझेलच्या भावात चार दिवसांत दुसऱ्यांदा वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)–** अवघ्या चार दिवसांत पुन्हा एकदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये वाढ करण्यात आली आहे. पेट्रोलच्या दरात हे ९१ पैशांनी तर डिझेलच्या दर ९४ पैशांनी वाढ करण्यात आली आहेत. त्यामुळे मुंबईतील पेट्रोलच्या दर थेट १०७.४९ तर डिझेलचा भाव प्रति लिटर ९४.०२ रुपयांच्या घरात पोहोचला आहे.

दि. १५ मे रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत तीन रुपयांनी वाढ करण्यात आली होती आणि आता अवघ्या चार दिवसांत पुन्हा एकदा दरवाढ करण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण होण्याची शक्यता आहे. यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोलच्या दरात ३ रुपये आणि डिझेलच्या दरात ३.११ रुपयांची घसघशीत वाढ करण्यात आली होती. त्याला चार दिवस उलटत नाही तोच आता पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दुसऱ्यांदा वाढ झाली आहे.

इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल युद्धामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर खनिज तेलाचे दर कडाडले आहेत. त्यामुळे भारतीय पेट्रोलियम कंपन्यांना मोठा तोटा सहन करावा लागत होता. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका संपताच केंद्र सरकारने यापैकी काही भार सर्वसामान्यांवर टाकायचे ठरवले असून त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या भावात वाढ होताना दिसत आहे. अवघ्या चार दिवसांमध्ये दुसऱ्यांदा पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढल्याने सर्वसामान्यांची चिंता वाढली आहे. आगामी काळात खनिज तेलाचे दर वाढून पेट्रोलियम कंपन्यांचा तोटा कायम राहिल्यास पेट्रोल आणि डिझेलचे दर आणखी वाढण्याची शक्यता आहे.

# अनाधिकृत बॅनरविरुद्ध दोन गुन्हे दाखल; बॅनरमुक्त संकल्पनेची अंमलबजावणी सुरु

**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेच्या पथकाकडून शहरात विविध ठिकाणी लावण्यात आलेल्या अनाधिकृत बॅनरविरूद्ध कारवाई सुरू करण्यात आली. यानुसार दि. १९ मे रोजी भाग्यनगर ठाण्यात एक व नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात एक असे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

शहरामध्ये महानगरपालिकेने १६५ ठिकाणी बॅनर किंवा होर्डिंग्ज लावण्यासाठी जागा अधिकृतरित्या दिल्या आहेत. परंतु या जागांशिवाय शहरात मुख्य रस्त्यावर, चौकात मोठमोठे बॅनर, होर्डिंग्ज, कट आउट लावण्यात येत असल्याने शहराचे मोठ्या प्रमाणात विद्रूपीकरण झाले आहे. अनधिकृत बॅनरमुक्त शहर करण्यासाठी महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आणि पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी लक्ष घातले असून अनधिकृत होर्डिंग्ज लावणाऱ्या तिघांविरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यात पहिला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला होता.




मंगळवार, दि.१९ मे रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास शिवपुरे व क्षेत्रीय कार्यालय क्र. ३ मधील अतिक्रमण पथक प्रमुख नांदेड उत्तर चे दत्ता कल्याणकर, वाहन चालक विकास शितळे, मजुर संघरत्न जोंधळे, सुदर्शन आठवले असे मिळून क्षेत्रिय कार्यालय क्र.३ हद्दीत विनापरवाना बेकायदेशिररित्या जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, व फ्लेक्स लाऊन सार्वजनिक मालमत्ता विद्रुपित करीत असेल तर संबंधिताविरुध्द कारवाई करण्याकरीता गस्त करत होते. उपआयुक्त अतिक्रमण व निर्मुलन विभाग यांच्या सुचनेनुसार व मार्गदर्शनाखाली बजाजनगर रोडवर हाय होल्टेज एम.एस.ई.बी. लाईनचे टॉवरवर वरून धवन रेसिडेन्सी फ्लॅटस् बुकिंगसाठी उपलब्ध आहेत, असे अनाधिकृत बॅनर लावण्यात आले होते. संबंधित बॅनर संदर्भात अधिक माहिती घेतली असता अनिल दिलीप यादव, गणेश कटकम (कंत्राटदार) आणि विशाल माठी रा. प्लॉट नंबर १२, महालक्ष्मी हायटेक बजाजनगर नांदेड यांनी लावल्याचे निष्पन्न झाले. भरत शिवपुरे यांनी भाग्यनगर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात कौठा भागात मुख्य रस्त्यावर लावण्यात आलेल्या अनधिकृत बॅनरविरुद्ध कारवाई करून अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निधीअभावी जलजीवनची ८२२ कामे ठप्पच!

## अनेक योजना कागदावरच पूर्ण; कोट्यवधी रुपये ओतूनही बहुतांश गावे तहानलेलीच

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील गाव, वाडी- वस्त्यांवरील नागरिकांना शुद्ध पाण्याचे स्वप्न दाखविणारी जनजीवन मिशन योजना नांदेड जिल्ह्यामध्ये सध्यातरी कागदावरच अडकल्याचे चित्र दिसून येत आहे. निधीचा ओघ पूर्णपणे आटल्याने जिल्ह्यातील ८२२ कामे ठप्प झालेली आहेत. ठेकेदारांची सुमारे १५० कोटी रुपयांची देयके शासनाकडे प्रलंबित असल्याने या कामांची गती मंदावल्याचे संबंधित अधिकाऱ्याने सांगितले आहे.

**जलजीवनच्या कामाची स्थिती**

**उद्दिष्ट -१२३४**
**पूर्ण कामे -४१२**
**अपूर्ण कामे -८२२**
**पाणीपुरवठा सुरु असलेली गावे -६९९**
**निधीची आवश्यकता -१५० कोटी**

ऑक्टोबर २०२४ पासून केंद्र आणि राज्य सरकारकडून या योजनेसाठी आवश्यक असलेला निधी प्राप्त झालेला नाही. यापूर्वी अनेकदा मुदतवाढ देऊनही कामांचे बोजवारा उडाला असून, सद्यस्थितीत ही योजना हवेत विरल्याचे चित्र आहे. वाढत्या खर्चामुळे आणि निधीच्या कमतरतेमुळे ठेकेदारांनी कामांकडे पाठ फिरवली आहे.

### उद्दिष्टांपासून जिल्हा दूर

नांदेड जिल्ह्याला एकूण १, २३४ पाणीपुरवठा योजनांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. मात्र, त्यापैकी केवळ ४१२ कामे पूर्ण झाली असून तब्बल ८२२ कामे अद्यापही अपूर्ण आहेत. योजनेचा वेग पाहता केंद्र सरकारने २०२८ पर्यंत मुदतवाढ दिली असली, तरी निधीशिवाय गाडा पुढे सरकणे अशक्य दिसत आहे. सध्या कामे पूर्ण झालेल्या केवळ ६९९ गावांमध्ये पाणीपुरवठा सुरु आहे.

जलजीवन मिशनच्या कामांसाठी मागील वर्षभरापासून आवश्यक निधी उपलब्ध झालेला नाही. जिल्ह्यातील ठेकेदारांची जवळपास १५० कोटींची बिले थकीत असल्याने कामांची प्रगती थांबली आहे. आम्ही शासनाकडे सविस्तर अहवाल पाठवला असून, निधी मिळविण्यासाठी आमचा पाठपुरावा सुरु आहे.

**-आर. डी. रावसाहेब,**
प्रभारी कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा, जि.प.नांदेड)




# परभणी-हिंगोली विधानपरिषद कोणाची?

## महायुतीत शिंदेंच्या जागेवर भाजप-राष्ट्रवादीची नजर, तर मविआमध्ये काँग्रेसच्या जागेवर ठाकरे गटाचा दावा!

**परभणी (प्रतिनिधी)–** केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक जाहीर करताच परभणी-हिंगोली जिल्ह्यात राजकीय घडामोडींना प्रचंड वेग आला आहे.

या मतदारसंघावर सध्या महायुतीमधील एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे वर्चस्व असले, तरी बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही बाजूंच्या मित्रपक्षांमध्ये रस्सीखेच सुरू झाली आहे. जागा एक आणि दावेदार अनेक अशी परिस्थिती निर्माण झाल्याने सर्वच पक्षांतील इच्छुकांनी आता थेट मुंबई गाठून जोरदार लॉबिंग सुरू केली आहे.

परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे विप्लव बाजोरिया हे आमदार होते. त्यामुळे परंपरेनुसार या जागेवर शिंदेंच्या शिवसेनेचा नैसर्गिक दावा आहे. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आपल्या संख्याबळाचा हवाला देत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने आणि भारतीय जनता पक्षाने देखील या जागेवर दावा ठोकला आहे. यामुळे महायुतीमधील तिन्ही पक्ष या एकाच जागेसाठी समोरासमोर ठाकले आहेत.

दुसरीकडे, विरोधी पक्षांची आघाडी असलेल्या महाविकास आघाडीतही आलबेल नसल्याचे चित्र आहे. गेल्या काही निवडणुकांचा इतिहास पाहता या मतदारसंघात काँग्रेसचे पारडे जड राहिले आहे. मात्र, यावेळेस शिवसेना ठाकरे गट थेट काँग्रेसच्या जागेवर दावा केला आहे.

जागा एक, पक्ष अनेक आणि त्यातल्या त्यात इच्छुकांची भाऊगर्दी झाल्यामुळे नेत्यांची डोकेदुखी वाढली आहे. त्यामुळे परभणी विधान परिषद निवडणूक महायुतीमधील तिन्ही पक्षांपैकी कोणता पक्ष लढवणार आणि महाविकास आघाडीतील दोन पक्षांपैकी कोण लढवणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# अफगानिस्तान दौऱ्यासाठी टीम इंडियाची घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अफगाणिस्तान विरुद्धच्या एकमेव कसोटी आणि तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. या दौऱ्यासाठी शुभमन गिल यांच्याकडे कसोटी आणि वनडे दोन्ही संघांचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे.

अफगाणिस्तान विरूद्धच्या वनडे सीरिजसाठी टीम इंडिया : शुबमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा (फिटनेसवर अवलंबून), विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, इशान किशन, हार्दिक पंड्या (फिटनेसवर अवलंबून), नितीश रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, प्रसीध कृष्णा, गुरनूर ब्रार आणि हर्ष दुबे.

# ओबीसी क्रिमीलेअर मर्यादा ८ लाखांवरून १५ लाख करण्याची शासनाकडे शिफारस

## ४३ नव्या जातींच्या समावेशाचा प्रस्ताव

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील ओबीसी नॉन क्रिमीलेअर मर्यादा ८ लाखांवरून १५ लाख करण्याची शिफारस करण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली उपसमितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत लवकरच बैठक आयोजित करण्यात येणार आहे.

याचसोबत ओबीसी समूदायात ४३ नव्या जातींच्या समावेशासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्याचा निर्णयही ओबीसी उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. ओबीसी जात पडताळणीच्या प्रलंबित प्रकरणांवर तातडीने निर्णय घ्यावा असे निर्देशही देण्यात आले आहेत.

ओबीसी उपसमितीच्या बैठकीत ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सवलतींवरही चर्चा करण्यात आली. चुकीच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप देऊ नयेत अशा सूचनाही देण्यात आल्या. ओबीसी समाजाच्या उन्नतीसाठी शैक्षणिक सक्षमीकरण आणि आर्थिक उन्नतीच्या विविध योजना राज्य शासन प्रभावीपणे राबवत आहे. राज्य शासनाने स्वतंत्र इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्थापना करून ओबीसी, विजाभज, एसबीसी आणि इतर मागास घटकांसाठी विविध कल्याणकारी योजनांना गती दिली आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# विकास आराखड्यातून शिक्षण गायब

देशाच्या भवितव्याशी निगडित असलेल्या शिक्षण क्षेत्राकडे पुन्हा एकदा गंभीरपणे पाहण्याची वेळ आली आहे. कारण नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या नीती आयोगाच्या अहवालाने देशातील शालेय शिक्षण व्यवस्थेचे अत्यंत चिंताजनक चित्र समोर आणले आहे. हा अहवाल केवळ आकडेवारी नसून सरकारला दाखवलेला आरसा आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक सरकारांनी शिक्षणाला प्राधान्य देण्याची भाषा केली, पण प्रत्यक्षात शिक्षणावरील खर्च कधीच अपेक्षित पातळीवर गेला नाही. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के खर्चाचे लक्ष्य अनेक दशकांपूर्वी निश्चित झाले होते; मात्र आजही शिक्षणावरील खर्च तीन टक्क्यांच्या आसपासच फिरताना दिसतो. अशा परिस्थितीत सरकारी शाळांची अवस्था खालावत जाणे हे आश्चर्यकारक नाही. नीती आयोगाच्या स्कूल एज्युकेशन सिस्टम ऑफ इंडिया या अहवालात धक्कादायक वास्तव समोर आले आहे. देशातील जवळपास निम्म्या विद्यार्थ्यांनी सरकारी शाळांमधून बाहेर पडून खासगी शाळांचा पर्याय निवडला आहे. २००५ मध्ये खासगी शाळांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण २९ टक्के होते, ते आता जवळपास ५० टक्क्यांवर पोहोचले आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे की, पालकांचा सरकारी शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास ढासळत चालला आहे. आज ग्रामीण भागातील अनेक शाळा एका शिक्षकावर चालतात. शिक्षकांची रिक्त पदे वर्षानुवर्षे भरली जात नाहीत. अनेक शिक्षकांना निवडणूक, जनगणना किंवा इतर प्रशासकीय कामांमध्ये गुंतवले जाते. वास्तविक पाहता जनगणनेसारखे काम हे महसूल खात्याचे आहे, पण आपला भार शिक्षकांवर टाकून ते मोकळे होतात. शिक्षणाच्या मूलभूत प्रक्रियेपेक्षा कागदी कामे आणि शासकीय मोहिमा यांनाच अधिक महत्त्व दिले जाते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचा पाया मजबूत कसा होणार? देशाला विश्वगुरू बनवण्याची भाषा केली जाते; मात्र त्या दिशेने जाण्यासाठी मजबूत प्राथमिक शिक्षण आवश्यक आहे, हे वास्तव दुर्लक्षित केले जात आहे. मुलींच्या शाळांमधील प्रवेशात वाढ झाली असली तरी देशातील अनेक शाळांमध्ये अद्याप स्वच्छतागृहे नाहीत किंवा ती वापरण्यायोग्य नाहीत. ग्रामीण भागात तर पिण्याच्या पाण्याचीही कमतरता आहे. डिजिटल शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक अभ्यासक्रमांच्या घोषणा केल्या जातात; पण विद्यार्थ्यांना बसायला वर्गखोली आणि वापरण्यायोग्य शौचालय मिळत नसेल तर त्या घोषणा केवळ दिखावा ठरतात. शिक्षण व्यवस्थेतील अधोगतीसाठी केवळ शिक्षकांना दोष देता येणार नाही. धोरण आखणारे अधिकारी, शिक्षणमंत्री आणि प्रशासन यांनाही जबाबदारी स्वीकारावी लागेल. अनेकदा शिक्षण हे राजकीय प्राधान्यक्रमात शेवटच्या क्रमांकावर दिसते. निवडणुका प्रचार आणि राजकीय भूलथापा यामध्ये शिक्षणाबाबत भूलथाप सुद्धा दिली जात नाही, हे देशाचे आणि जनतेचे दुर्दैव म्हणावे लागेल. सत्ता मिळविणे आणि ती टिकविणे या व्यवस्थापनातच सरकार अधिक गुंतलेले असते; पण देशाचे भविष्य घडवणाऱ्या शाळांकडे आवश्यक तेवढे लक्ष दिले जात नाही. एकेकाळी सरकारी शाळांमधूनच देशातील सर्वोत्तम अधिकारी, वैज्ञानिक, साहित्यिक आणि नेते घडले. सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी सरकारी शाळा ही गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आशा होती. आज परिस्थिती उलटली आहे. खासगी शाळा उत्तम पायाभूत सुविधा, इंग्रजी माध्यम, तंत्रज्ञान आणि आकर्षक वातावरण देत असल्यामुळे पालक कर्ज काढूनही मुलांना तिथे पाठवत आहेत. खरं तर अशा खाजगी शाळांमध्ये शिक्षणाची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असते पण भौतिक सुविधांना भुलून पालक आपल्या पाल्यांना त्या शाळेमध्ये पाठवतात. शिक्षणाचे व्यापारीकरण वाढत असताना गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवर आर्थिक ताण वाढत आहे. देशाच्या दीर्घकालीन विकासासाठी मानवी भांडवलाची निर्मिती आवश्यक आहे. रस्ते, पूल, बुलेट ट्रेन आणि मोठे प्रकल्प महत्त्वाचे असले तरी शिक्षणाशिवाय कोणत्याही राष्ट्राची प्रगती टिकाऊ होऊ शकत नाही. अमेरिका, ब्रिटनसारख्या विकसित देशांनी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सातत्याने गुंतवणूक केली. भारतात मात्र शिक्षणाचा प्रश्न अजूनही राजकीय घोषणांपुरता मर्यादित दिसतो. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण लागू होऊन अनेक वर्षे झाली; पण त्याचे प्रत्यक्ष परिणाम ग्रामीण आणि सरकारी शाळांमध्ये दिसत नाहीत. अभ्यासक्रम बदलणे पुरेसे नाही, तर शिक्षक प्रशिक्षण, पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि शाळांमधील मूलभूत सुविधा यांवर ठोस काम करणे आवश्यक आहे. आज गरज आहे ती शिक्षणावर विशेष संसदीय अधिवेशन घेण्याची. देशातील सर्व राज्यांनी शिक्षण क्षेत्रासाठी ठोस रोडमॅप तयार करणे आवश्यक आहे. शिक्षक भरती तातडीने करणे, सरकारी शाळांना आधुनिक सुविधा देणे, ग्रामीण भागातील शिक्षण मजबूत करणे आणि शिक्षणावरील खर्च वाढवणे ही काळाची गरज आहे. नीती आयोगाच्या अहवालाने सरकारला आरसा दाखवला आहे. आता त्या आरशात दिसणारे वास्तव स्वीकारून सुधारणा करण्याचे धैर्य सत्ताधाऱ्यांनी दाखवले पाहिजे. कारण दुर्लक्षित शिक्षणव्यवस्था म्हणजे देशाच्या भविष्यासोबत केलेली मोठी तडजोड ठरेल.

# इंधनदरवाढीने अर्थव्यवस्था वाचेल की सामान्य माणूस होरपळेल?

देशाची अर्थव्यवस्था अनेकदा अशा वळणावर येऊन उभी राहते, जिथे सरकार आणि अर्थतज्ज्ञांना कठोर निर्णयांचा विचार करावा लागतो. सध्या भारतासमोर उभे राहिलेले चालू खात्यावरील तूट हे असेच एक गंभीर आर्थिक आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर एचएसबीसीने केलेली पेट्रोल-डिझेल आणखी महाग करा ही सूचना चर्चेचा विषय ठरली आहे. अर्थकारणाच्या दृष्टीने हा सल्ला योग्य वाटत असला, तरी त्याचे सामाजिक आणि मानवी परिणामही तितक्याच गांभीर्याने पाहावे लागतील.



चालू खात्यावरील तूट म्हणजे देशातून परकीय चलन अधिक प्रमाणात बाहेर जाणे आणि त्याच्या तुलनेत कमी प्रमाणात डॉलर देशात येणे. भारतासारखा मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात करणारा देश जागतिक बाजारातील तेलाच्या किमतींवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. तेल महागले की देशाच्या आयात खर्चात प्रचंड वाढ होते. त्यातच रुपयाचे अवमूल्यन झाले, तर परिस्थिती आणखी बिकट बनते. म्हणूनच अर्थतज्ज्ञ इंधनाचा वापर कमी करण्यासाठी पेट्रोल-डिझेलचे दर वाढवण्याचा उपाय सुचवतात.

हा विचार वरकरणी तर्कसंगत वाटतो. इंधन महागले की वाहनांचा वापर काही प्रमाणात कमी होतो, अनावश्यक प्रवास टाळला जातो आणि तेल आयातीत काही प्रमाणात बचत होऊ शकते. त्यामुळे डॉलरची गळती कमी होऊन चालू खात्यावरील तूट नियंत्रणात राहण्यास मदत मिळू शकते. आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने पाहता हा उपाय चुकीचा म्हणता येणार नाही.

मात्र अर्थकारणाचे गणित हे फक्त आकड्यांचे नसते; त्यामागे माणसांचे आयुष्य दडलेले असते. पेट्रोल-डिझेलचे दर वाढले की त्याचा परिणाम केवळ वाहनधारकांपुरता मर्यादित राहत नाही. वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचे पडसाद बाजारातील प्रत्येक वस्तूच्या किमतीवर उमटतात. भाजी-पाला, धान्य, दूध, औषधे, बांधकाम साहित्य सर्व काही महाग होऊ लागते. आधीच वाढत्या महागाईने त्रस्त असलेल्या मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांचे आर्थिक गणित आणखी विस्कळीत होते.

ग्रामीण भारतासाठी ही समस्या अधिक गंभीर आहे. शेतीमध्ये डिझेलवर चालणाऱ्या पंपांचा, ट्रॅक्टरचा आणि वाहतुकीचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. इंधनदरवाढ म्हणजे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात वाढ. शेती आधीच तोट्यात असताना हा अतिरिक्त भार त्यांच्या संकटात भर घालणारा ठरू शकतो. शहरातील माणूस कदाचित वाहनाचा वापर कमी करू शकेल; पण ग्रामीण भागात अनेकांसाठी डिझेल हा पर्याय नसून गरज आहे.

याहून महत्त्वाचा प्रश्न म्हणजे इंधनदरवाढ हा खरोखर दीर्घकालीन उपाय आहे का? एखाद्या घरात खर्च वाढला म्हणून सतत काटकसर करणे काही काळ उपयोगी पडू शकते; पण कायमस्वरूपी प्रगतीसाठी उत्पन्न वाढवावे लागते. देशाच्या अर्थव्यवस्थेलाही हेच लागू होते. भारताने आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी ऊर्जा स्रोतांकडे अधिक गांभीर्याने वळायला हवे. सौर ऊर्जा, हरित ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, मजबूत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि देशांतर्गत उत्पादन वाढवणे हेच खरे शाश्वत मार्ग ठरू शकतात.

त्याचबरोबर निर्यात वाढवणे, उद्योगांना चालना देणे आणि परदेशी गुंतवणूक आकर्षित करणेही आवश्यक आहे. गुंतवणूकदारांना स्थिर धोरणे, चांगली पायाभूत सुविधा आणि पारदर्शक व्यवस्था हवी असते. जर देशात रोजगारनिर्मिती वाढली आणि उत्पादनक्षमता सुधारली, तर डॉलरचा ओघ नैसर्गिकरीत्या वाढू शकतो. अशा परिस्थितीत इंधनदरवाढीसारखे कठोर उपाय कमी प्रमाणात वापरावे लागतील.

एचएसबीसीचा इशारा निश्चितच गांभीर्याने घेण्यासारखा आहे. चालू खात्यावरील तूट वाढणे ही धोक्याची घंटा आहे. परंतु त्या समस्येवर उपाय म्हणून केवळ पेट्रोल-डिझेल महाग करणे हा सर्वसमावेशक मार्ग ठरू शकत नाही. अर्थव्यवस्थेचे संतुलन राखताना सामान्य नागरिकांच्या जीवनमानाचाही विचार करावा लागतो. आर्थिक शिस्त आणि सामाजिक संवेदनशीलता यांचा समतोल राखणारी धोरणेच देशाला दीर्घकालीन स्थैर्य आणि स्वावलंबनाकडे घेऊन जाऊ शकतात.

आजचा खरा प्रश्न असा आहे देशाची अर्थव्यवस्था वाचवण्यासाठी सामान्य माणसाला आणखी किती किंमत मोजावी लागणार?

**–मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# वेब डिझायनर : सजृनशीलता आणि कौशल्य

ज्यांनी इंटरनेटला दृष्यदृष्ट्या आश्चर्यकारक आणि वापरकर्त्यासाठी अनुकूल स्थान बनवले आहे. मग डिजिटल जगाच्या या अनसन्ग हिरोंना आम्ही आमच्या हॅट्स का टिपतो? सुरुवातीसाठी त्यांच्याशिवाय इंटरनेटची कल्पना करा. हे सूर्यप्रकाशाशिवाय दिवसासारखे आहे, बरोबर? वेब डिझायनर आम्ही दररोज भेट देत असलेल्या वेबसाइट्स बनवतात, त्यांची सर्जनशीलता आणि कौशल्य या साइट्स चांगल्या दिसण्यासाठी आणि सुरळीतपणे काम करतात याची खात्री करण्यासाठी करतात. ते पडद्यामागील विझार्ड आहेत. सर्वकाही क्लिक, स्क्रोल आणि चकचकीत होईल, याची खात्री करून घेतात. परंतु हे फक्त गोष्टी सुंदर बनवण्याबद्दल नाही, हे त्यापेक्षा बरेच काही आहे. वेब डिझायनर डे आम्हांला आमच्या डिजिटल जीवनात वेब डिझाइनच्या महत्त्वपूर्ण महत्त्वाची आठवण करून देतो.

हे वापरकर्त्याच्या अनुभवाबद्दल आणि कार्यक्षमतेबद्दल आहे. वेबसाइट्स केवळ लक्षवेधी नसून नेव्हिगेट आणि वापरण्यासही सोप्या आहेत, याची खात्री करा. हा दिवस वेब डिझायनर्समधील समुदायाला प्रोत्साहन देतो, त्यांना ज्ञान सामायिक करण्यासाठी, सहयोग करण्यासाठी आणि एकमेकांना प्रेरणा देण्यासाठी प्रोत्साहित करतो आणि आपण या डिजिटल कलाकारांना कसे साजरे करू शकता? तुम्ही कौतुकास्पद नजरेने इंटरनेटच्या चमत्कारांमध्ये डुबकी मारू शकता किंवा कदाचित तुमच्या ओळखीच्या वेब डिझायनरपर्यंत धन्यवाद संदेशासह पोहोचू शकता. काही लोक कृतज्ञता दाखवण्यासाठी वेब डिझायनर्सना कॉफी किंवा जेवणासाठी घेऊन जातात. शेवटी, अनेक वेब डिझायनर्स कॅफीनवर भरभराट करतात! वेब डिझाईन वर्कशॉप्स किंवा कॉन्फरन्सेसमध्ये सहभागी होण्यासारखे गुंतण्याचे बरेच मार्ग आहेत, जे शिकण्यासाठी आणि नेटवर्किंगसाठी विलक्षण आहेत. तर, या वेब डिझायनर दिवसात इंटरनेटला आपल्या सर्वांना एक्सप्लोर करायला आवडते. असे ठिकाण बनवण्याच्या कौशल्य आणि सर्जनशीलतेचे कौतुक करण्यासाठी थोडा वेळ का देऊ नये?

साधा धन्यवाद संदेश पाठवून, प्रेरणादायी डिझाईन्स शेअर करून किंवा क्षेत्रात काहीतरी नवीन शिकून असो, प्रत्येक गोष्ट वेब डिझाइनची कला आणि विज्ञान साजरी करण्यास मदत करते. वेब डिझायनर दिवसाचा इतिहास– वेब डिझायनर डे दरवर्षी ३१ मे रोजी साजरा केला जातो, हा सर्जनशील विचारांसाठी एक होकार आहे जे आम्ही दररोज ब्राउझ करत असलेल्या वेबसाइट डिझाइन करतो. या दिवसाची उत्पत्ती स्पष्टपणे दस्तऐवजीकरण केलेली नाही, परंतु डिजिटल युगात त्याचे महत्त्व निर्विवाद आहे. इंटरनेटच्या सुरुवातीच्या दिवसांपासून वेब डिझायनर्सची भूमिका लक्षणीयरीत्या विकसित झाली आहे. सुरुवातीला, वेब डिझाइन खूपच मूलभूत होते, मुख्यतः फक्त साध्या मजकूर पृष्ठांवर लक्ष केंद्रित केले. तथापि, जसजसे इंटरनेट वाढले आणि तंत्रज्ञान प्रगत झाले, तसतसे वेब डिझाइनची जटिलता आणि महत्त्व वाढले. वेब डिझाईन डेव्हलपमेंट– आज आपल्याला माहित आहे की १९९०च्या दशकाच्या मध्यात जोरदार सुरुवात झाली, हा कालखंड वेगवान तांत्रिक प्रगती आणि तथाकथित ब्राउझर युद्धांनी चिन्हांकित केला. या युगात सीएसएस, डायनॅमिक एचटीएमएल आणि जावास्क्रिप्ट सारख्या गंभीर वेब डिझाइन तंत्रज्ञानाचा परिचय झाला, ज्यामुळे अधिक परिष्कृत आणि वापरकर्ता-अनुकूल वेबसाइट्सना अनुमती मिळाली. आज वेब डिझाइन हे सौंदर्यशास्त्राबद्दल आहे आणि वापरकर्ता अनुभव, प्रवेशयोग्यता आणि मोबाइल प्रतिसादाचा समावेश करते, जे आपल्या दैनंदिन जीवनात इंटरनेटची अविभाज्य भूमिका प्रतिबिंबित करते.

वेब डिझायनर डे साजरा करण्यामध्ये वेब डिझाईनमध्ये जाणाऱ्या क्लिष्ट कामाचे आणि सर्जनशीलतेचे कौतुक करणे समाविष्ट आहे. वेब डिझाईनबद्दल अधिक जाणून घेऊन, त्यांना माहित असलेल्या वेब डिझायनर्सचे आभार मानून किंवा फील्ड अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी वेब डिझाइन कोर्स घेऊन लोक हा दिवस साजरा करू शकतात. सोशल मीडियावर थशलऊीीळसपशीऊ या हॅशटॅगसह अनुभव शेअर करणे आणि वेब डिझायनर्सच्या योगदानाची कबुली देणे हा या प्रसंगी साजरा करण्याचा आणखी एक मार्ग आहे. वेब डिझायनर्सचे महत्त्व जास्त सांगता येणार नाही. आम्ही दररोज नेव्हिगेट करत असलेली डिजिटल लँडस्केप तयार करण्यासाठी, आमचे ऑनलाइन अनुभव आनंददायक, प्रवेशयोग्य आणि कार्यक्षम बनवण्यासाठी ते जबाबदार आहेत. अगदी नवीन वेबसाइट विकसित करणे किंवा हौशी वेबमास्टर्ससाठी टेम्पलेट्स वापरणे असो, प्रत्येक वेब डिझायनर विशाल आणि सतत विस्तारणाऱ्या डिजिटल विश्वामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो.

वेब डिझाइनच्या विशाल महासागराचे अन्वेषण करून उत्सवाला सुरुवात करा. फक्त ब्राउझ करण्यासाठीच नाही तर त्यामागील कलात्मकता आणि नाविन्यपूर्णतेची प्रशंसा करण्यासाठी वेगवेगळ्या वेबसाइट्स चाळा. एखाद्या आर्ट गॅलरीला भेट देण्यासारखे विचार करा, जिथे प्रत्येक वेबसाइट कौतुकाची वाट पाहत असलेली उत्कृष्ट नमुना आहे. हे छोटेसे साहस प्रेरणा निर्माण करू शकते किंवा डिजिटल कॅनव्हासेससाठी तुमचे कौतुक वाढवू शकते जे सहसा गृहीत धरले जाते. सोशल मीडियावर तुमच्या आवडत्या वेब डिझायनर्सना ओरडून सांगा. डिजिटल जगाला पडद्यामागील प्रतिभांबद्दल ऐकू द्या, मग ते एक साधे धन्यवाद ट्विट असो किंवा त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य असलेली इंस्टीट्यूट कथा असो. त्यांचे कार्य टॅग केल्याने सकारात्मकता पसरते आणि पडद्यामागील नायकांवर प्रकाश पडतो. लक्षात ठेवा, थोडीशी ओळख एखाद्याचा दिवस उजाळा देण्यासाठी खूप पुढे जाऊ शकते! वेब डिझाईनमध्ये डॅबलिंगबद्दल कधी विचार केला आहे? वेब डिझायनर डे हा प्रारंभ करण्यासाठी योग्य वेळ आहे. अगणित विनामूल्य ऑनलाइन ट्यूटोरियल आणि संसाधनांसह, तुम्हाला उत्सुकता असलेले एक कौशल्य निवडा आणि त्यात प्रवेश करा.



मूलभूत एचटीएमएल/सीएसएस किंवा यूएक्स डिझाइन तत्त्वांसारखे काहीतरी अधिक प्रगत असो, काही तास शिकण्यासाठी समर्पित करा. कुणास ठाऊक? ही कदाचित नवीन छंदाची सुरुवात किंवा करिअर शिफ्ट देखील असू शकते. तुमच्या स्लीव्हवर तुमचे कौतुक का घालू नये– अक्षरशः काही वेब डिझाइन–थीम असलेली व्यापारी वस्तू खेळा किंवा तुमची स्वतःची तयार करा. टी–शर्टवरील विनोदी कोडींग विनोदांपासून ते वेब डिझाइन टूल्सला होकार देणाऱ्या क्सेसरीजपर्यंत, वेब डिझाइन समुदायाबद्दल तुमची प्रशंसा दृष्यदृष्ट्या व्यक्त करण्याच्या मार्गांची कमतरता नाही. शिवाय, आमच्या डिजिटल जगात वेब डिझाइनच्या महत्त्वाबद्दल हे एक उत्तम संभाषण आहे. वेब डिझायनर डे साजरा करण्यासाठी भव्य जेश्चरची आवश्यकता नाही. हे सर्जनशीलता, कौशल्य आणि कठोर परिश्रमाची कबुली देण्याबद्दल आहे जे इंटरनेटला एक दृश्यास्पद आणि कार्यक्षम जागा बनवते. आपण वेब डिझाईनचे शौकीन असाल किंवा उत्तम प्रकारे तयार केलेल्या वेबसाइट्सचे चाहते असाल, या प्रसंगी चिन्हांकित करण्यासाठी बरेच खेळकर आणि विचित्र मार्ग आहेत.

**–कृष्णकुमार निकोडे**
गडचिरोली
मो. ९४२३७१४८८३

# मधुमक्षिका आणि तिचा इतिहास



आज २० मे, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक मधमाशी दिन म्हणून साजरा केला जातो. अँतोन जोंसा या जगप्रसिद्ध मधुमक्षिका पालन तज्ज्ञाचा २० मे १७३४ रोजी स्लोव्हनिया या देशातील गरीब कुटुंबात जन्म झाला. त्यांनी १७६६ मध्ये युरोपात पहिले मधमाशी पालन केंद्र सुरू केले. १७७१ मध्ये त्यांनी मधुमाशी पालनावरील पहिले पुस्तक प्रकाशित केले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २० मे २०१८ पासून २० मे हा दिवस जागतिक मधमाशी दिन म्हणून घोषित केला.

या दिवशी मधमाशांचे संवर्धन करण्यासह कीटकांचे संवर्धन करण्यासाठी जनजागृती केली जाते. मधमाशी हा पर्यावरणातील अतिशय महत्वाचा घटक आहे. मधमाशी हे जीवसृष्टीला मिळालेले सर्वोत्तम वरदान आहे. मधमाशीला सामाजिक कीटक असे म्हटले जाते. मधमाशा इतर किटकांप्रमाणे एकट्या–दुकट्या राहात नाहीत तर त्या समूह करून राहतात. त्यांच्या घराला पोळे असे म्हणतात. एका पोळ्यात हजारो मधमाशा असतात. मधमाशा त्यांच्या अन्नाच्या पूर्ततेसाठी फुलातील मकरंद आणि पराग गोळा करतात. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर परागकणांचे स्थलांतर करतात त्यामुळे फुलांची बीजधारणा व फलधारणा होते त्यालाच परागीभवन असे म्हणतात.

परागीभवनामुळे पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखवले आहे. त्यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत. तरीही मधमाशीपालनाबाबत आपल्याकडील शेतकरी अजूनही गंभीर नाहीत. उलट मधमाशांचे पोळे जाळून त्यांना शेतातून हाकलून देण्याकडेच शेतकऱ्यांचा कल असतो. पूर्वी शेतात, बांधावर, आजूबाजूला सहज नजरेस पडणारी मधमाशांची पोळे आता दिसत नाही. मधासाठी पोळे जाळणे, कीटकनाशके फवारणे, मोबाईल टॉवर उभारणे, मधमाशांविषयी अज्ञान पसरवणे या कारणांमुळे मधमाशीसारखा उपयुक्त जीव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. परिसरातील मधमाशा नष्ट झाल्या तर त्याचा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो म्हणून आपण सर्वांनी मधमाशांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी पुढे आले पाहिजे.

मधमाशांची शास्त्रिय माहिती घेऊन तिचे संगोपन करण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. पराग सिंचनामुळे शेती उत्पाद–नात वाढ होत असल्याने मध व मेन या बाबीपेक्षा उत्पादनातील वाढ हा महत्वाचा घटक मानून शेतकऱ्यांनी मधमाशी पालनाला अग्रक्रम द्यायला हवा. सरकारनेही याबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करायला हवे. रोजगार निर्मितीला वाव असल्याने मधमाशी पालन हा पुरक उद्योग म्हणून केल्यास ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मधमाशी ही आपल्यासाठी अतिशय महत्वाचे काम करते. मधमाशांकडून शिकण्यासारखेही खूप आहे. समूहात राहून आदर्श जीवन कसे जगावे हे मधमाशांकडून शिकावे. दीर्घ कष्ट केल्याने मधासारखा गोड पदार्थ निर्माण करता येतो हे मधमाशांनी दाखवून दिले आहे.

मधमाशी हा केवळ मानवासाठीच नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टीसाठी अतिशय महत्वाचा घटक आहे. आपण सर्वांनी मधमाशी वाचवण्याचा पर्यायाने जीवसृष्टी वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तरच मधमाशी दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# उन्हाळ्यातील सुट्टीमध्ये झाडे लावा झाडे जगवा...

आजच्या काळात वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि हवामानातील बदल यामुळे पर्यावरण धोक्यात आले आहे. शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि निरोगी जीवन यासाठी झाडे अत्यंत आवश्यक आहेत. झाडे आपल्याला प्राणवायू देतात, उष्णता कमी करतात आणि पावसाचे प्रमाण टिकवून ठेवतात. त्यामुळे उन्हाळ्याच्या सुट्टीत आपण झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प केला पाहिजे. उन्हाळ्याची सुट्टी म्हणजे मोकळा वेळ, खेळ, मजा आणि नवीन गोष्टी शिकण्याची संधी. या सुट्टीचा उपयोग आपण समाजासाठी उपयुक्त कामात करू शकतो. आपल्या घराजवळ, शाळेत, बागेत किंवा गावात रिकामी जागा शोधून तेथे झाडे लावता येतील. आंबा, कडुलिंब, वड, पिंपळ, जांभूळ, गुलमोहर अशी झाडे लावल्यास परिसर सुंदर आणि हिरवागार बनेल.

विद्यार्थी झाडे लावून आपल्या पर्यावरणाची काळजी घेऊ शकतात. झाडे लावणे हे निसर्गाची काळजी घेण्याचे सुंदर कार्य आहे, जे हवा स्वच्छ ठेवते, हवामान सुधारते आणि प्राण्यांना आश्रय देते. पर्यावरणाचे रक्षण करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, पाणी वाचवणे आणि ऊर्जा बचत करणे या सर्व गोष्टींमुळे आपले जीवन हे सुंदर आणि निरोगी राहते. झाडे लावणे आणि जपणे हे आपले पर्यावरण रक्षण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आपली सुट्टी ही पर्यावरणाची काळजी घेण्याच्या कार्यासाठी वापरू या.

झाडे आपल्याला अनेक प्रकारे मदत करतात. ती हवा शुद्ध करतात, धूळ आणि धूर कमी करतात. झाडांमुळे पक्ष्यांना निवारा मिळेल. पावसाचे प्रमाण



वाढण्यास मदत होते. तसेच जमिनीची धूप थांबते. आज जगभरात तापमान वाढत आहे. या समस्येवर उपाय म्हणून जास्तीत जास्त झाडे लावणे आवश्यक आहे.

झाडे लावणे ही एक छान आणि महत्त्वाची कल्पना आहे. त्यातून आपला पर्यावरणाचा देखील विचार होतो आणि वातावरण देखील स्वच्छ राहते. हवामानानुसार आणि जागेच्या गरजेनुसार योग्य झाडे निवडा. उदा. सावलीसाठी वड, पिंपळ, अशोक, तर फळांसाठी चिकू, संत्री, लिंबू इत्यादी. जमिनीत योग्य नांगरणी करा, खत टाका आणि जागा स्वच्छ करा. उन्हाळ्यात सकाळी किंवा संध्याकाळी झाडे लावणे योग्य राहते, जेणेकरून झाडांना उष्णतेची जास्त भीती वाटत नाही. झाडांना नियमितपणे, विशेषतः उन्हाळ्यामध्ये, पुरेसे पाणी देणे आवश्यक आहे. झाडांची निगराणी करा, आवश्यकतेनुसार खत द्या आणि काढणी करा. या कामातून आपली सुट्टी मजेशीर आणि उपयोगी जाईल, तसेच पर्यावरणाला मदत होईल.

प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक तरी झाड लावावे आणि त्याची जबाबदारी घ्यावी. मित्रांना, शेजाऱ्यांना आणि कुटुंबातील सदस्यांना ही झाडे लावण्यासाठी प्रोत्साहित करावे. आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केला तर आपला परिसर हिरवागार आणि सुंदर होईल. झाडे ही निसर्गाची अमूल्य देणगी आहेत. उन्हाळ्याच्या सुट्टीत आपण झाडे लावली आणि त्यांची नीट काळजी घेतली, तर भविष्यात आपले पर्यावरण अधिक सुरक्षित राहील. झाडे लावा, झाडे जगवा हा केवळ नारा नसून तो आपल्या जीवनाचा भाग झाला पाहिजे. आपण आज एक झाड लावले, तर उद्या त्यातून संपूर्ण समाजाला फायदा होईल. झाडे लावणे आणि जपणे आपल्या पर्यावरणासाठी खूप महत्त्वाचे आहे. म्हणून सर्वांनी मिळून वृक्षारोपणाचा संकल्प करूया आणि आपल्या भविष्यासाठी हिरवगार वातावरण तयार करूया चला, या उन्हाळ्यात आपण सर्व मिळून काही झाडे लावूया, त्यांची काळजी घेऊया आणि पर्यावरणाचे रक्षण करूया झाडे लावूया आणि आपले पर्यावरण जपूया.

**–श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

# खाजगी शिकवणींचा वाढता बाजार आणि ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षण व्यवस्थेवरील संकट





**शंकरनगर (प्रतिनिधी)–** खाजगी शिकवणींचा वाढता बाजार आणि ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षण व्यवस्थेवरील संकट ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन धोक्यात येण्याची भीती पालकवर्गातून व्यक्त केली जात आहे.

शंकरनगर परिसरासह ग्रामीण भागांतील पालकांचे म्हणणे आहे की, खाजगी शिकवणींच्या अमाप फीमुळे गोरगरीब जनतेच्या खिशाला मोठी कात्री लागत आहे. एकीकडे शिक्षण हक्काचा विषय असताना दुसरीकडे शिक्षणाचे उघडपणे व्यापारीकरण होत असल्याचे चित्र दिसत आहे.

आज परिस्थिती अशी झाली आहे की, खाजगी शाळा आणि शिकवण्या केवळ फीच घेत नाहीत, तर विद्यार्थ्यांना वही, पुस्तके, ड्रेस, पेन आणि इतर साहित्यही शाळेतूनच घेणे बंधनकारक केले जाते. अतिरिक्त शुल्काच्या नावाखाली पालकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी आणि कष्टकरी पालक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज काढतात, मजुरी करतात; मात्र लाखो रुपये खर्च करूनही विद्यार्थ्यांच्या भविष्यासंदर्भात निश्चितता दिसून येत नाही. अनेक वेळा महागड्या शिकवण्या असूनही विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण घेणे कठीण बनत आहे.

खाजगी शिकवणींवर नियंत्रण आणावे, अशी मागणी पालकांकडून होत आहे. प्रत्येक शाळेचे फी दरपत्रक शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर लावणे बंधनकारक करावे. वही, पुस्तके, ड्रेस यांची सक्ती थांबवावी. शिक्षण विभागाने शाळा सुरू होण्यापूर्वी फी आणि अतिरिक्त शुल्कांची तपासणी करावी. शाळांमधील हजेरीपट व शिक्षकांची शैक्षणिक गुणवत्ता तपासावी. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शाळेत शिकवणे बंधनकारक करावे. जर शिक्षण विभागाने जूनपूर्वीच या बाबींवर कठोर कारवाई केली, तर शिक्षणातील वाढता व्यापार काही प्रमाणात कमी होईल आणि जिल्हा परिषद शाळांनाही पुन्हा चांगले दिवस येतील, अशा प्रतिक्रियाही ग्रामीण भागातील पालकवर्गातून व्यक्त होत आहेत.

जर शिक्षण पैशांच्या जोरावर चालू लागले तर गरीब विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जाईल आणि शिक्षण व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास उडेल, अशी भीतीही पालवर्गातून व्यक्त केली जात आहे.

# जिल्ह्यात वेगवेगळ्या तीन ठिकाणी फसवणुकीच्या घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत फसवणुकीच्या तीन वेगवेगळ्या घटना उघडकीस आल्या असून, यामध्ये सोन्याचे दागिने, शेअर मार्केट गुंतवणूक तसेच बनावट इलेक्ट्रिक वस्तू विक्रीद्वारे लाखो रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे समोर आले आहे. संबंधित प्रकरणांमध्ये पोलिसांनी गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे.

पहिली घटना इस्लापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. सहस्त्रकुंड वाळकी बुद्रुक (ता. किनवट) येथे राहणारे फिर्यादी शिल्पा शंकरराव वाळकीकर (वय ४०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी सतीश बाबुराव सकवान (वय ४३, रा. इस्लापूर) याने फिर्यादीचे सुमारे १८ तोळे ४ ग्रॅम सोन्याचे दागिने, किंमत अंदाजे ५ लाख ७० हजार ४०० रुपये, परस्पर विकून विश्वासघात करत फसवणूक केली. हा व्यवहार १ जानेवारी २०१३ ते १७ मे २०२६ च्या दरम्यान सहस्त्रकुंड वाळकी बुद्रुक तालुका किनवट येथे घडला. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी इस्लापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१६ (२), ३१८(२), ३५२ आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीमती कागणे करत आहेत.

दुसरी घटना वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. गुजराती हायस्कूलजवळ राहणाऱ्या अपूर्वा कैलास पाटील (वय २७) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, संतोषसिंग चंदेल (रा. गोविंदनगर, नांदेड) याने शेअर मार्केटमध्ये अधिकचा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून तब्बल १६ लाख ६१ हजार रुपयांची फसवणूक केली. पैसे परत न करता विश्वासघात केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१६ (२) व ३१८ (४) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक लोंढे करत आहेत.

# भाजयुमोच्या नांदेड महानगरची जम्बो कार्यकारिणी जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)** –भारतीय जनता पार्टी महानगर नांदेड अंतर्गत 'युवा मोर्चा'ची वर्ष २०२६ ची अधिकृत जिल्हा कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष माजी आमदार अमरनाथ राजूरकर आणि युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत पाटील क्षीरसागर यांच्या स्वाक्षरीने ही अधिकृत यादी नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली आहे. आगामी काळातील संघटनात्मक बांधणी आणि युवकांचे संघटन अधिक बळकट करण्यासाठी या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे.

नव्या कार्यकारिणीमध्ये युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी शशिकांत क्षीरसागर असून, त्यांच्यासोबत सरचिटणीस, उपाध्यक्ष आणि चिटणीस पदांवर जिल्ह्यातील कार्यतत्पर युवा चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे.

प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिकृत यादीनुसार नूतन पदाधिकारी खालीलप्रमाणे आहेत. यात सरचिटणीसपदी ओम बंडेवार, प्रियेश ठाकूर, करण चव्हाण, शिवा लोट, उपाध्यक्षपदी विशाल संपतवार, अक्षय पवार, शुभम खोडके, मारोती जाधव, माधव शिरसाठ, बालाजी काळे, निखील पुरी, सुजलसिंग फौजी, बालाजी बोकारे, आसिफ शेख, बलदीप यादव, प्रताप पाटील, पवीतसिंग आरतीया, किरण पारधे, पार्थ देशमुख, अध्ययन तेहरा, अर्चितसिंग चौधरी, सुशील यादव, विजय यादव, विक्रांत पार्डीकर, चिटणीसपदी मोहसीन शेख, अर्जुन कोकाटे, गजानन कदम, बालाजी गंजेवार, युवराज शिंदे, विशाल गिरी, प्रेम वीर, अभिनव कुलकर्णी, लखन उमरीकर, पार्थ शर्मा, प्रथमेश चौधरी, सचिन नरंगले, बालाजी गंजेवार, सतीश हातागळे, शिवा धुमाळ, शिवा कांबळे, शुभम महाजन, तानाजी चव्हाण, महेश कुलकर्णी, अजय यादव, प्रदीप मस्के, संतोष कोकाटे, लेखराज शिंगणकर आदींचा नवीन कार्यकारिणीत समावेश आहे.

या कार्यकारिणीमुळे युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, भाजयुमोच्या नूतन कार्यकारिणीत सर्वसमावेशक व वेगवेगळ्या भागातील सक्षम कार्यकर्त्यांना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. या निवडीबद्दल भाजपचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे कौतुक करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. नव्या पदाधिकाऱ्यांमुळे नांदेड शहरात भाजप युवा मोर्चाची ताकद अधिक वाढेल, असा विश्वास युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत पाटील क्षीरसागर यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

# जिल्हास्तरीय पुरुष व महिला वरिष्ठ गट ॲथलेटिक्स मैदानी स्पर्धेचे नांदेड येथे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटना नांदेड यांच्यातर्फे व महाराष्ट्र ॲथलेटिक्स संघटना पुणे यांच्या मान्यतेने नांदेड येथे गुरुवार, दि.२१ मे २०२६ रोज सकाळी ६ वाजता सायन्स कॉलेज मैदान नांदेड येथील मैदानावर जिल्हास्तरीय २० वर्षाच्या वरील पुरुष व महिला वरिष्ठ गटातील जिल्हास्तरीय मैदानी ॲथलेटिक्स स्पर्धेचे व राज्यस्तरीय स्पर्धेच्या निवड चाचणीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हा संघटनेचे सचिव प्रलोभ कुलकर्णी यांनी दिली.

राज्यस्तरीय स्पर्धा दि.३१ मे ते २ जून २०२६ या कालावधीत पुणे या ठिकाणी संपन्न होणार आहेत. स्पर्धेसाठी येताना खेळाडूंनी सोबत नाव नोंदणीसाठी एक फोटो, मूळ १० वी ची सनद, मूळ जन्म दाखला, नगरपालिका किंवा ग्रामपंचायत, आधार कार्ड प्रत्येक क्रीडा प्रकारासाठी २०० रुपये शुल्क व प्रथम नोंदणी शुल्क १५० रु घेऊन उपस्थित राहावे. राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धेसाठी किमान कामगिरी पात्रता प्राप्त करणाऱ्या खेळाडूस पुढील स्पर्धेत सहभागी होता येईल.

तसेच FI ची नोंदणी करणे आवश्यक आहे. सोळा वर्षाखालील खेळाडूंनी या स्पर्धेत भाग घेऊ नये.तसेच बाहेर जिल्ह्यातील खेळाडूंनी भाग घेऊ नये. स्पर्धा निरीक्षक म्हणून योगेश थोरबोले, सचिव उस्मानाबाद जिल्हा ॲथलेटिक्स संघटना हे उपस्थित राहणार आहेत. तरी जिल्ह्यातील १००, २००,४००, ६००, ८००, ५००० मीटर धावणे,१० कि. मी. धावणे, २०,३० कि.मी. चालणे तसेच गोळाफेक, भालाफेक, थाळीफेक, हातोडा फेक, लांब उडी, तिहेरी उडी, रिले, क्रॉस कंट्री या प्रकारामध्ये भाग घेणाऱ्या खेळाडूंनी जास्तीत जास्त संख्येने व आवश्यक त्या तयारीनिशी उपस्थित राहावे, असे आवाहन नांदेड जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटनेचे अध्यक्ष राजे खंडेराव देशमुख पळशीकर, उपाध्यक्ष डॉ. अर्जुन मापारे, डॉ. दि. भा. जोशी, डॉ उमेश भालेराव, जिल्हा क्रिडाधिकारी नादेड जयकुमार टेंम्बरे, थलेटिक कोच शिवकांता देशमुख, नारायण सूर्यवंशी, कुमार कुलकर्णी, अमरीकसिंघ वासरीकर, अविनाश रामगिरवार,महेंद्र कुडगुलवार, प्रशांत जोशी, राजेश तिवाड़ी, किशोर पाठक , विनोद गोस्वामी, प्रवीण साले, शारदा कदम, सुरेश पद्मावार, रूपाली कुलकर्णी, किरण कुलकर्णी, भगवान नागरगोजे, विष्णू पुर्णे, प्रा. अमृत जाधव, वैभव दमकोडवार, डी. डी. चव्हाण, मुजाजी काकडे, लक्ष्मण फुलारी, बालाजी भवानकर, संतोष सोनसळे, संतोष आणेराव, ज्ञानेश्वर सोनसळे, शेख शब्बीर, संतोष वाकोडे, बालाजी गाडेकर,कांचन मस्के, रविकिरण क्षीरसागर, डॉ. महेश जाधव, शिवा जाधव,साईनाथ दंतुलवाड, गंगाधर हबर्डे , ज्ञानेश्वर कोडलांडे , नंदू जाधव , सिद्धोधन नरवाडे,विजय गव्हाणे आदी पदाधिकारी यांनी केले आहे.

# पुणे विभागातील दौंड-मनमाड दरम्यान दुहेरीकरणाच्या कामांमुळे गाड्यांचे मार्गांतर

**नांदेड (प्रतिनिधी)** –मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील दौंड मनमाड विभागात विसापूर, रांजणगाव, सरोळा दुहेरीकरण कामासंदर्भात प्री-नॉन इंटरलॉकिंग व नॉन इंटरलॉकिंग कामे करण्यात येणार आहेत. या कामांसाठी १९ मे २०२६ ते २७ मे२०२६ दरम्यान वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार असून, त्यानुसार खालील गाड्यांचे मार्गांतर व नियमन करण्यात येणार आहे.

गाडी क्र. ११४०९ दौंड-निजामाबाद एक्सप्रेस दिनांक १९ मे २०२६ रोजी दौंड येथून सुटणारी गाडी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी - निजामाबाद मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४१० निजामाबाद-पुणे एक्सप्रेस दिनांक १८ मे २०२६ रोजी निजामाबाद येथून सुटणारी गाडी निजामाबाद - परभणी - लातूर रोड- कुर्डुवाडी-दौंड-पुणे मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४०९ दौंड-निजामाबाद एक्सप्रेस दिनांक २० मे २०२६ रोजी दौंड येथून सुटणारी गाडी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी- निजामाबाद मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४१० निजामाबाद-पुणे एक्सप्रेस दि. १९ मे २०२६ रोजी निजामाबाद येथून सुटणारी गाडी निजामाबाद-परभणी-लातूर रोड - कुर्डुवाडी-दौंड-पुणे मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४०९ दौंड-निजामाबाद एक्सप्रेस दिनांक २२ मे २०२६ रोजी दौंड येथून सुटणारी गाडी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी - पूर्णा-निजामाबाद मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४१० निजामाबाद-पुणे एक्सप्रेस दिनांक २१ मे २०२६ रोजी निजामाबाद येथून सुटणारी गाडी निजामाबाद-परभणी-पूर्णा-लातूर रोड-कुर्डुवाडी-दौंड-पुणे मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४०९ दौंड-निजामाबाद एक्सप्रेस दि. २३ मे २०२६ रोजी दौंड येथून सुटणारी गाडी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी -पूर्णा-निजामाबाद मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४१० निजामाबाद-पुणे एक्सप्रेस दिनांक २२ मे २०२६ रोजी निजामाबाद येथून सुटणारी गाडी निजामाबाद-पूर्णा-परभणी-लातूर रोड -कुर्डुवाडी-दौंड मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४०९ दौंड-निजामाबाद एक्सप्रेस दि. २४ मे २०२६ रोजी दौंड येथून सुटणारी गाडी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी- पूर्णा-निजामाबाद मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४१० निजामाबाद-पुणे एक्सप्रेस दि. २३ मे २०२६ रोजी निजामाबाद येथून सुटणारी गाडी निजामाबाद-पूर्णा-परभणी-लातूर रोड - कुर्डुवाडी-दौंड मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४०९ दौंड-निजामाबाद एक्सप्रेस दि. २५ मे २०२६ रोजी दौंड येथून सुटणारी गाडी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी - पूर्णा-निजामाबाद मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४१० निजामाबाद-पुणे एक्सप्रेस दि. २४ मे २०२६ रोजी निजामाबाद येथून सुटणारी गाडी निजामाबाद-पूर्णा-परभणी-लातूर रोड-कुर्डुवाडी दौंड मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४०९ दौंड-निजामाबाद एक्सप्रेस दि. २६ मे २०२६ रोजी दौंड येथून सुटणारी गाडी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी पूर्णा निजामाबाद मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४१० निजामाबाद-पुणे एक्सप्रेस दि. २५ मे २०२६ रोजी निजामाबाद येथून सुटणारी गाडी निजामाबाद-पूर्णा - परभणी-लातूर रोड-कुर्डुवाडी दौंड मार्गे चालविण्यात येईल.

गाडी क्र. ११४०९ दौंड-निजामाबाद एक्सप्रेस दि. २७ मे २०२६ रोजी दौंड येथून सुटणारी गाडी दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड - परभणी-पूर्णा-निजामाबाद मार्गे चालविण्यात येईल.

# औषध विक्रेता बंदच्या पार्श्वभूमीवर नांदेडमध्ये नियंत्रण कक्ष स्थापन

**नांदेड (प्रतिनिधी)** –ऑल इंडिया ऑर्गनायजेशन ऑफ केमिस्ट अँण्ड ड्रगिस्ट यांच्या वतीने २० मे २०२६ रोजी एक दिवसाचा बंद पुकारण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी औषध व अन्न प्रशासनाच्या सहायक आयुक्त कार्यालयाने जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे.

नियंत्रण कक्षासाठी सहायक आयुक्त (औषधे) अ. तु. राठोड (मो. ८३६९०२७०६८), अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती शि. व. श्रीरामे (मो. ८०८०१०८८१८) तसेच लिपीक टंकलेखक अ. रा. पाटील (मो. ८४४६३१८९८३) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बंदच्या कालावधीत गरजू रुग्णांना औषधे उपलब्ध न झाल्यास अथवा अत्यावश्यक औषधांची गरज भासल्यास नागरिकांनी वरील क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

तसेच संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी नागरिकांनी आवश्यक औषधे आगाऊ खरेदी करून ठेवावीत, असेही अन्न व औषध प्रशासनाने कळविले आहे.

# 'यशवंत' एनसीसीला ब्रिगेडियर अनुप बरबरे यांच्याद्वारे निरीक्षण भेट

**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंत महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना कक्षासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी क्षण दि. १८ मे रोजी अनुभवायला मिळाला. छत्रपती संभाजीनगर येथील ग्रुप कमांडर ब्रिगेडियर अनुप बरबरे तसेच ५२ महाराष्ट्र बटालियन एनसीसी नांदेडचे कमांडिंग ऑफिसर कर्नल दिलीप रेड्डी यांनी महाविद्यालयातील एनसीसी विभागास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



विद्यार्थ्यांना सैनिकी क्षेत्रातील बदलते आव्हान, राष्ट्रीय सेवेचे महत्त्व आणि नेतृत्व गुणाविषयी मार्गदर्शन करणे हा या भेटीमागील हेतू होता.

यावेळी ब्रिगेडियर अनुप बरबरे यांना महाविद्यालयाच्या वतीने गार्ड ऑफ ऑनर देण्यात आले. प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी दोन्ही मान्यवरांचे स्वागत केले.

तद्नंतर एनसीसी विभागाची सखोल प्रशासकीय तपासणी करीत विभागाच्या कार्यपद्धतीचे व विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध कामगिरीचे विशेष कौतुक केले. तसेच भविष्यातही विभागाने याच जोमाने राष्ट्रीय सेवेची परंपरा पुढे चालू ठेवावी, अशा मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांना संबोधित करताना ब्रिगेडियर अनुप बरबरे म्हणाले की, राष्ट्रीय छात्र सेना हे केवळ संघटना नसून, देशभक्ती, शिस्त, धैर्य आणि नेतृत्व घडविणारी एक जीवनशाळा आहे. एनसीसीमधून तयार होणारे विद्यार्थी भारताच्या एकात्मतेचे आणि संरक्षणाचे खरे शिलेदार ठरतात. प्रत्येक कॅडेटने राष्ट्रीय सेवा हीच सर्वोत्तम सेवा म्हणून जीवनात प्रामाणिकपणे कार्य केले पाहिजे.

कार्यक्रमाचे आयोजन एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट प्रा. श्रीकांत सोमठाणकर यांनी केले. संपूर्ण महाविद्यालय परिसर देशभक्ती, शिस्त आणि अभिमानाच्या भावनेने भारावून गेला होता.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एसयुओ रणवीर ठाकूर, जेयुओ बापूराव नवरखेले, जेयुओ रविकांत कांबळे, निशा तेलंगे तसेच इतर एनसीसी कॅडेट्सनी परिश्रम घेतले. तसेच प्रसिद्धी समन्वयक डॉ. अजय गव्हाणे, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक गजानन पाटील यांनी सहकार्य केले.

# देगलूर येथील अपंग प्रशिक्षण केंद्रात ३० जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे यांच्यामार्फत शासन मान्यता प्राप्त तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र देगलूर या संस्थेत म. रा. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परीक्षा मंडळ मुंबई मार्फत मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासाठी १८ ते ४० वयोगटातील दिव्यांग, अस्थिव्यंग, मूकबधीर, अंध, मतिमंद, मुला-मुलींना प्रवेश देण्यात येत आहे. या प्रशिक्षण केंद्रात विद्युत तारतंत्री, सर्व्हिसिंग ऑफ इलेक्ट्रीक डोमेस्टिक ऍप्लायसेंस, मोबाईल रिपेअरिंग अँड सर्व्हिसिंग, फीटर, एलिमेंट ऑफ कॉम्प्युटर इंजिनिअरींग, कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम. एस. ऑफीस, डेस्क टॉप पब्लिशिंग कॉम्प्युटर अकाँटिंग व ऑफिस ऑटोमेशन व अगरबत्ती, खडू, धूप बनवणे इत्यादी अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात येत आहे.

इच्छुक दिव्यांग, अस्थिव्यंग, मूकबधीर, अंध, मतिमंद मुला-मुलींनी किंवा पालकांनी ३० जून २०२६ पर्यंत प्राचार्य तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, भायेगाव रोड, देगलूर, जि. नांदेड येथे पत्रव्यवहार करावा किंवा समक्ष भेटावे. अधिक माहितीसाठी मो. ९९६०९००३६९, ९४०३२०७१००,७३७८६४११३६ वर संपर्क साधावा, असे आवाहन कर्मशाळा अधीक्षक तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र देगलूर यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम : सुशिक्षित बेरोजगारांसाठी उद्योग उभारणीची सुवर्णसंधी

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देणारी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) ही महत्त्वाकांक्षी योजना जिल्हा उद्योग केंद्र व ग्रामोद्योग मंडळामार्फत ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पात्र अर्जदारांना उद्योग उभारणीसाठी ५० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंतच्या प्रकल्पांना अनुदान दिले जाते. जिल्ह्यातील जास्तीत-जास्त पात्र युवक-युवतींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाने शहरी व ग्रामीण भागातील वाढती सुशिक्षित बेरोजगारांची संख्या लक्षात घेऊन स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना सुरू केली आहे. उत्पादन, सेवा व कृषीपूरक उद्योग व्यवसायांसाठी ही योजना लागू आहे.

**योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये** – वय मर्यादा : किमान १८ वर्षे पूर्ण, अर्जदार हा स्थानिक रहिवासी व स्थायी उत्पन्न नसलेले युवक-युवती, प्रकल्प मर्यादा - सेवा व कृषीपूरक उद्योग : कमाल ५० लाख रुपये, उत्पादन उद्योग : कमाल १ कोटी रुपये.

शैक्षणिक पात्रता - १० लाखांवरील उत्पादन प्रकल्पांसाठी ५ लाखांवरील सेवा व कृषीपूरक प्रकल्पांसाठी, अर्जदार किमान ८ वी उत्तीर्ण असणे आवश्यक. अर्जदाराने यापूर्वी शासनाच्या कोणत्याही अनुदानाधारित स्वयंरोजगार योजनेचा लाभ घेतलेला नसावा. **आवश्यक कागदपत्रे** -पासपोर्ट साइज फोटो, आधार कार्ड, पॅन कार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, जात प्रमाणपत्र (लागू असल्यास), ग्रामीण भागासाठी लोकसंख्येचा दाखला, व्यवसायासंदर्भातील इतर आवश्यक कागदपत्रे. अर्ज करण्यासाठी संकेतस्थळ : https://maha-cmegp.gov.in योजनेविषयी अधिक माहितीसाठी इच्छुकांनी जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, पहिला मजला, शिवाजीनगर, नांदेड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. योजना राबविण्यासाठी कोणत्याही खाजगी व्यक्तीची नियुक्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे मध्यस्थामार्फत अर्ज भरू नयेत, असे कळविण्यात आले आहे.

# ज्येष्ठांच्या मागण्या तातडीने सोडवा अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल -डॉ. हंसराज वैद्य

**नांदेड (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान हाच खरा राष्ट्राभिमान असा ठाम संदेश देत, उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग ज्येष्ठ नागरिक संघ 'फेस्कॉम' (नांदेड) च्या वतीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह राष्ट्रपती, पंतप्रधान आणि विरोधी पक्षनेत्यांना विविध प्रलंबित मागण्यांचे सविस्तर निवेदन ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहे. ग्रामीण व शहरी भागातील ज्येष्ठ नागरिकांची होत असलेली उपेक्षा थांबवून शासनाने तातडीने ऐतिहासिक निर्णय घ्यावा; अन्यथा राज्यभरात तीव्र निषेध मोर्चे व आंदोलने छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य यांनी दिला आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या सद्य-स्थितीबद्दल त्यांनी तीव्र चिंता व्यक्त करताना म्हटले आहे की, ज्यांनी राष्ट्र निर्मिती, संस्कृती संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जपण्यात आयुष्य वेचले, आज तेच ज्येष्ठ नागरिक उपेक्षा, आर्थिक असुरक्षितता आणि मानसिक वेदना सहन करत आहेत. साठ वर्षांनंतर शरीर साथ देत नसल्याने अनेकजण काम करण्यास असमर्थ ठरतात. कुटुंबातील बदलत्या मानसिकतेमुळे अनेकांना स्वतः च्या घरातच उपेक्षित जीवन जगावे लागत असून, दोन वेळची भाकर, चहा आणि औषधपाण्यासाठीही संघर्ष करावा लागत आहे. शासनाने तातडीने मानधन व इतर सुविधा सुरू केल्यास ज्येष्ठ नागरिक कुटुंबावरचे ओझे न राहता त्यांना आदराची वागणूक मिळू शकेल. त्यासाठी ज्येष्ठ नागरिकांचे वय ६० वर्षेच ग्राह्य धरून केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ ६० वर्षांवरील सर्व नागरिकांना लागू करण्यात यावा, ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित २००७ चा कायदा, २०१० चे नियम आणि २०१३ चे पारित धोरण व कायदा यांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी. ज्येष्ठ नागरिकांना दोन वेळची रोटी, चहा व औषध पाण्यासाठी दरमहा किमान ५ हजार रुपये मानधन देणारी मुख्यमंत्री ज्येष्ठ लाडके मायबाप योजना तत्काळ सुरू करावी, ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे, बस आणि हवाई प्रवास विनामूल्य, सुरक्षित व आरक्षित करण्यात यावा. तसेच त्यांना संपूर्ण मोफत आरोग्य विमा व आरोग्य कवच शासनाने उपलब्ध करून द्यावे., ज्येष्ठ नागरिकांना करमुक्त दर्जा देण्यात यावा. तसेच त्यांचे प्रश्न सोडवणुकीसाठी स्वतंत्र ज्येष्ठ नागरिक मंत्रालय स्थापन करावे, विधान परिषद व राज्यसभेत ज्येष्ठ नागरिकांना हक्काचे प्रतिनिधित्व देण्याची कायदेशीर तरतूद करण्यात यावी यासह इतर विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. या निवेदनावर अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य, सचिव प्रभाकर कुंटूरकर आणि कोषाध्यक्ष गिरीश बाऱ्हाळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव २० मेपर्यंत सादर करण्याचे आवाहन


**नांदेड (प्रतिनिधी)** –फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट खेळाडू विद्यार्थ्यांच्या क्रीडा सवलत गुण वाढीचे प्रस्ताव 'आपले सरकार' पोर्टलवर तसेच संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आले होते.

मात्र, काही तांत्रिक कारणांमुळे तसेच त्रुटींअभावी हे प्रस्ताव विहित मुदतीत लातूर विभागीय मंडळाकडे प्राप्त झाले नसल्याने संबंधित विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण देण्यात आलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या शिफारसीसह २० मे २०२६ पर्यंत लातूर विभागीय मंडळाकडे सादर करावेत, असे आवाहन विभागीय सचिव अनुपमा भंडारी यांनी केले आहे.

निर्धारित मुदतीनंतर कोणतेही प्रस्ताव स्वीकारले जाणार नसल्याची नोंद संबंधितांनी घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय



## शिळ्या अन्न कधी बनते उलट्या, जुलाब अन् पोटदुखीचे कारण...

# उरलेले अन्न कसे खावे?

**प्रत्येक घरात कधी ना कधी अन्न उरते आणि बहुतेक लोक ते पुन्हा खातात. उरलेले किंवा शिळे अन्न खाणे ठीक आहे. मात्र जर ते योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने खाल्ले नाही तर उलट्या, जुलाब आणि पोटदुखी यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. हे टाळण्यासाठी, उरलेल्या अन्नाचा वापर कसा करावा हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे...**

उन्हाळ्यात तापमान लक्षणीयरीत्या वाढते. या हंगामात अन्न लवकर खराब होते. उष्ण आणि दमट हवामानात जीवाणू वेगाने वाढतात. यामुळेच उन्हाळ्यात पोटाच्या संसर्गाची प्रकरणे अधिक सामान्य असतात. उन्हाळ्यात शिळे, अस्वच्छ किंवा अयोग्यरित्या साठवलेले अन्न खाणाऱ्या लोकांना उलट्या, जुलाब आणि पोटदुखी यांसारख्या समस्या जाणवू शकतात. ही समस्या विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि अशक्त व्यक्तींसाठी धोकादायक ठरू शकते. अनेक घरांमध्ये आदल्या दिवशी तयार केलेले अन्न रात्री वापरले जाते. असे करण्यात काही गैर नाही, परंतु उरलेले अन्न कसे वापरावे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. आम्ही उरलेल्या शिळ्या अन्नाचे दुष्परिणाम आणि ते योग्यरित्या कसे वापरावे हे स्पष्ट करत आहोत.

### शिळ्या अन्नाचे धोके

उन्हाळ्यात अन्न लवकर खराब होते. कारण उष्ण तापमानात जीवाणूंची वेगाने वाढ होते. दुग्धजन्य पदार्थ, शिजवलेला भात, सॅलड, चिकन, मासे आणि रस्त्यावरील खाद्यपदार्थ यांसारखे नाशवंत पदार्थ रेफ्रिजरेटरमध्ये न ठेवल्यास आणि जास्त काळ बाहेर ठेवल्यास हानिकारक ठरू शकतात. कधीकधी अन्न दिसायला आणि वासाने ठीक वाटू शकते, परंतु त्यात हानिकारक जीवाणू असू शकतात. त्यामुळे लोक अनेकदा खराब झालेले अन्न खातात आणि नकळत आजारी पडतात. उन्हाळ्यात, साल्मोनेला, ई. कोलाय आणि स्टॅफिलोकोकस यांसारखे जीवाणू अन्नाला दूषित करू शकतात. बरेच लोक शिळे अन्न व्यवस्थित गरम न करताच खातात. काही लोक रात्रीचे जेवण फ्रिजमध्ये न ठेवता सकाळी किंवा दुपारी खातात. ज्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो. फक्त गरम केल्याने जिवाणूंचे विषारी घटक नेहमीच नष्ट होत नाहीत.

### पोटाच्या संसर्गाची लक्षणे

उन्हाळ्यात शिळे आणि दूषित अन्न खाल्ल्याने पोटाचा संसर्ग होऊ शकतो. गंभीर प्रकरणांमध्ये रुग्णाला सतत उलट्या होणे, शौचातून रक्त येणे, निर्जलीकरण, चक्कर येणे किंवा बेशुद्ध पडणे यांसारखी लक्षणे दिसू शकतात. पोटाच्या संसर्गामध्ये काही लक्षणे सामान्यतः दिसून येतात. यात मळमळ आणि उलट्या, अतिसार, पोटात गोळा येणे, पोटदुखी, ताप, अशक्तपणा आणि थकवा, भूक न लागणे, निर्जलीकरण, डोकेदुखीचा समावेश आहे.

### रस्त्यावरील खाद्यपदार्थ...

उन्हाळ्यात रस्त्याच्या कडेला उघडे अन्न खाणे धोकादायक असू शकते. कापलेली फळे, चाट, गोलगप्पे आणि इतर रस्त्यावरील खाद्यपदार्थ धूळ, माश्या आणि अस्वच्छ पाण्यामुळे दूषित होऊ शकतात. बाहेर ठेवलेले अन्न तीव्र उष्णतेमुळे लवकर खराब होते. त्यामुळे या हंगामात बाहेर जेवताना अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे.

» **उन्हाळ्यात शरीरात पाण्याची पातळी योग्य राखणे महत्त्वाचे आहे. दिवसभर भरपूर पाणी प्या. घराबाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत ठेवा. जास्त वेळ उपाशी राहिल्याने अशक्तपणा येऊ शकतो. त्यामुळे, वेळेवर हलके आणि पौष्टिक जेवण करा. उन्हाळ्यात सावधगिरी बाळगणे हाच सर्वोत्तम उपाय आहे. निरोगी आहार आणि चांगली स्वच्छता राखल्याने उन्हाळ्यातील अनेक आजार टाळता येतात.**

### शरीराचे निर्जलीकरणापासून संरक्षण करा...

उन्हाळ्यात पोटाच्या संसर्गाची किंवा अन्न विषबाधेची सर्वात मोठी समस्या म्हणजे निर्जलीकरण, म्हणजेच शरीरातील पाण्याची कमतरता. वारंवार उलट्या आणि जुलाबामुळे निर्जलीकरण होते. यामुळे अशक्तपणा, तोंड कोरडे पडणे, चक्कर येणे आणि रक्तदाब कमी होणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. लहान मुले आणि वृद्धांमध्ये निर्जलीकरण लवकरच गंभीर होऊ शकते. बरेच लोक सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे आजार आणखी बिघडू शकतो. जर एखाद्या व्यक्तीला सतत उलट्या, जुलाब, पोटदुखी किंवा जास्त ताप असेल, तर त्यांनी त्वरित वैद्यकीय मदत घ्यावी. पुरेसे द्रवपदार्थ द्या. ओरल रिहायड्रेशन सोल्युशन (ORS), नारळाचे पाणी आणि लिंबाचे पाणी निर्जलीकरण भरून काढण्यास मदत करू शकतात. विश्रांती घेणे देखील आवश्यक आहे.

### उरलेल्या अन्नाचा वापर कसा करावा?

पैसे वाचवण्यासाठी अनेक लोक खराब झालेले अन्न खातात, परंतु यामुळे त्यांच्या आरोग्याला गंभीर हानी पोहोचू शकते. उन्हाळ्यात हलके आणि ताजे अन्न खाणे सर्वात सुरक्षित मानले जाते. अति तेलकट, मसालेदार आणि प्रक्रिया केलेले पदार्थ पचनक्रियेत अडथळा आणू शकतात आणि पोटाच्या समस्या वाढवू शकतात. उन्हाळ्यात पोटाच्या संसर्गाचा धोका कमी करण्यासाठी काही उपाय केले जाऊ शकतात. जसे, की...

» शिळे किंवा बराच वेळ बाहेर ठेवलेले उरलेले अन्न खाणे टाळा.



» शिजवलेले अन्न ताबडतोब फ्रिजमध्ये ठेवा. उरलेले अन्न थंड झाल्यामुळे खराब होत नाही आणि ते पुन्हा खाल्ले जाऊ शकते.

» फळे आणि भाज्या खाण्यापूर्वी पूर्णपणे धुवा.

» स्वच्छ, सुरक्षित पाणी प्या.

» रस्त्याच्या कडेला सापडलेली कापलेली फळे आणि उघडे अन्न खाणे टाळा.

» जेवण्यापूर्वी आपले हात पूर्णपणे धुवा.

» स्वयंपाकघरातील स्वच्छता आणि अन्न साठवण्याकडे लक्ष द्या.

» विचित्र वास किंवा चव असलेले पदार्थ खाणे टाळा.

## मनाला लागलेली ठेच बनवू शकते मानसिक रोगी

# केव्हा अन् कसा होतो Grief Disorder

**कधीकधी एखादी व्यक्ती दुःखाने इतकी निराश होते, की त्याला स्वतःला सांभाळणे कठीण होऊन जाते. जेव्हा तो स्वतःवर नियंत्रण ठेवू शकत नाहीत, तेव्हा ग्रीफ डिसऑर्डरचा बळी ठरतो. ग्रीफ डिसऑर्डरच्या रुग्णाला उपचारांसोबतच कौटुंबिक आधाराचीही गरज असते. कौटुंबिक आधार आणि प्रेम रुग्णाला लवकर बरे होण्यास मदत करते...**

शरीराप्रमाणेच मनही आजारी पडते, परंतु बहुतेक लोक मनाच्या आजाराकडे दुर्लक्ष करतात. शारीरिक आजार दिसतो, त्यामुळे त्यावर त्वरित उपचार केले जातात. मनाचा आजार दिसत नाही, परंतु त्याचा व्यक्तीवर खोलवर परिणाम होतो. ग्रीफ डिसऑर्डर हा एक मानसिक आजार आहे, जो एखादी व्यक्ती खूप दुःखी असताना होतो. आयुष्यात असे क्षण येतात जेव्हा एखाद्या व्यक्तीला स्वतःवर नियंत्रण ठेवणे कठीण होते. प्रिय व्यक्तीचा मृत्यू, नैसर्गिक आपत्तीत सर्वस्व गमावणे किंवा व्यवसायात असे नुकसान होणे ज्यातून सावरणे कठीण असते. अशा परिस्थितीत अनेक लोक ग्रीफ डिसऑर्डरचे बळी ठरतात. ग्रीफ डिसऑर्डर म्हणजे काय, त्याची लक्षणे आणि त्यावरील उपचार याबद्दल जाणून घेऊया...



### ग्रीफ डिसऑर्डर म्हणजे काय?

ग्रीफ डिसऑर्डरला दीर्घकाळ टिकणारे दुःख असेही म्हटले जाते. जेव्हा आपण आपल्या प्रिय व्यक्तीला गमावतो, तेव्हा दुःख होणे स्वाभाविक आहे. प्रत्येकजण या स्थितीतून जातो. पण समस्या तेव्हा सुरू होते, जेव्हा हे दुःख खूप काळ टिकून राहते आणि हळूहळू व्यक्तीच्या संपूर्ण जीवनावर परिणाम करू लागते. असे वाटते की जणू काही आयुष्य थांबले आहे आणि पुढे जाण्याची कोणतीही इच्छा किंवा शक्ती शिल्लक राहिलेली नाही. सामान्य दुःख कालांतराने कमी होऊ लागते. व्यक्ती हळूहळू कामावर, नात्यांमध्ये आणि जीवनात परत येते. तथापि, ग्रीफ डिसऑर्डरच्या बाबतीत असे होत नाही. दुःखाची तीव्रता तशीच राहते. ती व्यक्ती वारंवार त्याच वेदनेत, त्याच आठवणींमध्ये आणि त्याच पोकळीत अडकते. या स्थितीत, व्यक्तीला हे समजते की त्यांनी कोणालातरी गमावले आहे, परंतु त्यांचे हृदय ते स्वीकारण्यास नकार देते. यामुळेच ते आंतरिक संघर्ष करत राहतात. त्यांना वाटते की कदाचित सर्व काही ठीक होईल किंवा जे घडले आहे ते खरे नाही. हा भावनिक संघर्ष बराच काळ चालू राहतो आणि मनाला थकवतो.

### ग्रीफ डिसऑर्डर का होतो?

दुःख किंवा शोक हा मानसिक आजार नाही. ही एक नैसर्गिक भावनिक प्रतिक्रिया आहे. तथापि, जर ते बराच काळ टिकून राहिले आणि एखाद्या व्यक्तीला सामान्य जीवन जगण्यापासून रोखत असेल, तर त्याचा मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. यामुळे चिंता, नैराश्य, झोपेच्या समस्या आणि एकटेपणा वाढू शकतो. काही लोक तणावाचा सामना करण्यासाठी अस्वास्थ्यकर सवयींकडे वळू शकतात. जेव्हा दुःख दाबले जाते किंवा त्याकडे दुर्लक्ष केले जाते, तेव्हा ते नाहीसे होत नाही. उलट, ते चिडचिड, राग, थकवा किंवा अंगदुखी यांसारख्या इतर स्वरूपात प्रकट होते. दुःख अनुभवणे आणि स्वीकारणे खूप महत्त्वाचे आहे.

### दु:ख हे प्रेमाचेच एक रूप

दुःखाच्या काळात, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की दुःख हे प्रेमाचेच एक रूप आहे. आसक्ती जितकी घट्ट, तितकेच दुःखही अधिक तीव्र. ती आसक्ती पुसून टाकणे हे ध्येय नसावे, तर तिचे अशा आठवणीत रूपांतर करणे हे असावे, जी तुम्हाला तोडण्याऐवजी अधिक मजबूत करेल. वेळ, संयम आणि योग्य आधाराने, दुःख हळूहळू कमी होऊ शकते. आणि एक दिवस, त्याच आठवणी, वेदनेसह, चेहऱ्यावर हास्य आणू लागतात.



### ग्रीफ डिसऑर्डरचे 5 टप्पे

» **लोक सहसा ग्रीफ डिसऑर्डरच्या पाच टप्प्यांमधून जातात. हे टप्पे नेहमी एकाच क्रमाने येतात असे नाही. काहींसाठी, ही प्रक्रिया हळूहळू पूर्ण होते आणि ते आयुष्यात पुढे जाऊ लागतात. तथापि, काही लोक या प्रक्रियेत अडकून पडतात. त्यांना वाटते की ते नेहमी त्याच वेदनेत अडकलेले राहतील. ग्रीफ डिसऑर्डरचे पाच टप्पे समजून घेऊ...**

» अस्वीकृती : ग्रीफ डिसऑर्डरचा पहिला टप्पा म्हणजे नकार. या टप्प्यात जे घडले आहे ते खरे आहे यावर व्यक्तीचा विश्वास बसत नाही. सर्व काही स्वप्नासारखे वाटते. वेदना कमी व्हावी म्हणून ते स्वतःला भावनांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात.

» राग : राग हा ग्रीफ डिसऑर्डरचा दुसरा टप्पा आहे. जस जसे सत्य हळूहळू उलगडत जाते, तसतसा राग येऊ शकतो. हा राग कोणावरही निर्देशित केला जाऊ शकतो, स्वतःवर, इतरांवर किंवा परिस्थितीवर. पण या रागामागे अनेकदा वेदना आणि असहाय्यता दडलेली असते.

» तडजोड : ग्रीफ डिसऑर्डरचा तिसरा टप्पा म्हणजे तडजोड करणे. या टप्प्यात व्यक्ती विचार करते, 'हे घडायला नको होते. मी दुसरे काहीतरी करायला हवे होते.' ते वारंवार मनात वेगवेगळ्या परिस्थितींची कल्पना करतात आणि विचार करतात की कदाचित गोष्टी बदलू शकल्या असत्या.

» नैराश्य : हा ग्रीफ डिसऑर्डरचा चौथा टप्पा आहे. या टप्प्यात, दुःख पूर्णपणे जाणवते. व्यक्तीला खूप दुःखी, एकटे आणि थकल्यासारखे वाटते. त्यांना काहीही आवडत नाही आणि जीवनातील रस कमी होतो.

#### ग्रीफ डिसऑर्डरची लक्षणे

» **व्यक्तीला सतत थकवा जाणवतो.**

» **झोप लागत नाही किंवा खूप जास्त झोप येते.**

» **कामावर लक्ष केंद्रित करता येत नाही.**

» **लोकांपासून दूर जाऊ लागतात.**

» **अंगदुखी आणि अशक्तपणा जाणवतो.**

» स्वीकार : ग्रीफ डिसऑर्डरच्या पाचव्या टप्प्यात स्वीकाराची भावना विकसित होते. याचा अर्थ असा नाही की दुःख संपले आहे. याचा अर्थ असा आहे की व्यक्तीने सत्य स्वीकारायला शिकले आहे. जे घडले आहे ते बदलता येणार नाही हे त्यांना समजते. हळूहळू, ते पुन्हा आपल्या जीवनावर नियंत्रण मिळवू लागतात.

### ग्रीफ डिसऑर्डर टाळण्याचे मार्ग

दुःखावर मात करण्यासाठी, सर्वप्रथम दुःख मान्य करणे महत्त्वाचे आहे. खंबीर दिसण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, तुम्ही दुःखी आहात हे मान्य करणे योग्य आहे. दुःखी वाटणे ही कमजोरी नाही; उलट, ती बरे होण्याची सुरुवात आहे. दुःखाच्या काळात आपल्या भावना व्यक्त करणे खूप उपयुक्त ठरते. तुम्ही तुमच्या विश्वासातील व्यक्तीशी बोलू शकता. बोलणे अवघड वाटत असल्यास तुम्ही लिहू शकता. डायरी लिहिणे, आपले विचार व्यक्त करणे, मनाला शांत करण्यास मदत करते. जेव्हा तुम्ही दुःखी असता, तेव्हा एकटे राहण्याऐवजी कोणाशीतरी संपर्क साधणे महत्त्वाचे असते. ही व्यक्ती तुमचा मित्र, कुटुंबातील सदस्य किंवा तुम्हाला समजून घेणारी कोणीही असू शकते. केवळ कोणासोबत असण्यानेही वेदना कमी होऊ शकतात. काही लोकांना आठवणींमधूनही दिलासा मिळतो, जसे की प्रिय व्यक्तीच्या स्मरणार्थ काहीतरी करणे, त्यांचा फोटो पाहणे किंवा त्यांच्याबद्दल बोलणे. यामुळे मनाला हे समजण्यास मदत होते की ती व्यक्ती पूर्णपणे गेलेली नाही, तर केवळ आठवणींमध्ये अस्तित्वात आहे. जर दुःख असह्य आणि हाताळण्यास कठीण असेल, तर तज्ज्ञांची मदत घेण्याची शिफारस केली जाते. दुःखावर मात करणे म्हणजे सर्व काही विसरणे नव्हे. याचा अर्थ



त्या नुकसानीसोबत जगायला शिकणे. हळूहळू, जीवनात पुन्हा आनंद शोधणे शक्य आहे.

# उष्णतेच्या लाटा, अशी घ्या काळजी...

**युनिसेफच्या मते, उष्णतेच्या लाटेचा इशारा असताना घराबाहेर पडण्यापूर्वी तापमान तपासा. उष्णतेत बाहेर जाताना ओआरएस पाकिटे, थर्मामीटर, पिण्याच्या पाण्याची बाटली, टॉवेल किंवा कापड आणि शक्य असल्यास बॅटरीवर चालणारा पंखा सोबत ठेवा. दिवसा पडदे ओढून ठेवा आणि संध्याकाळी व रात्री खिडक्या उघड्या ठेवा.**



दिवसा तीव्र उष्णतेत बाहेर जाणे टाळा. बाहेर जाताना सनस्क्रीन, सनग्लासेस, टोपी आणि छत्री यांचा वापर नक्की करा. तहान लागली नसली तरीही, वारंवार पाणी प्या. जास्त कपडे घालणे टाळा आणि सैल सुती कपडे घाला. जर तुम्हाला कडक ऊन आणि उष्णतेच्या लाटेदरम्यान तीव्र थकवा, चक्कर येणे, डोके हलके वाटणे, शरीराचे तापमान वाढणे किंवा अंगावर पुरळ येणे यांसारखी लक्षणे जाणवत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. हे उष्माघात किंवा उष्णतेमुळे होणाऱ्या थकव्याचे लक्षण असू शकते, ज्यासाठी त्वरित वैद्यकीय मदतीची आवश्यकता असते.

### काय टाळावे?




२३ मेपर्यंत हवामान खात्याने दिलेल्या उष्णतेच्या लाटेच्या इशाऱ्यादरम्यान, प्रत्येकाने शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यावर आणि हलक्या उन्हाळी आहारावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. डिहायड्रेशन (पाणी कमी होणे) आणि उष्माघात टाळण्यासाठी, टरबूज, काकडी, खरबूज यांसारखी मोसमी फळे, नारळाचे पाणी, ताक, लिंबू सरबत आणि हलके घरगुती जेवण यांचा आहारात समावेश करा. या काळात चहा, कॉफी, तळलेले, मसालेदार आणि प्रक्रिया केलेले पदार्थ यांचे अतिसेवन टाळा, कारण यामुळे शरीरातील अंतर्गत उष्णता वाढू शकते आणि उष्णतेच्या लाटेत थकवा येऊ शकतो.

# विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे शेतकरी कर्जमाफीचा निर्णय लांबणीवर पडणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीवेळी सत्तेत येण्यासाठी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. कर्जमाफीचा निर्णय आता आणखी काही दिवस लांबवणीवर पडण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जून महिन्यापर्यंत कर्जमाफी होईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, कर्जमाफीच्या या निर्णयाला विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेचा ब्रेक लागला आहे. विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता सोमवारपासून लागू होणार आहे. ही निवडणूक बिनविरोध न झाल्यास २५ जूनपर्यंत आचारसंहिता राहणार आहे.

३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफी करण्याचे सरकारचे आश्वासन होते. सहकार मंत्रालयाने तसा प्रस्तावही तयार केला होता. मात्र, आता विधानपरिषद निवडणुकीमुळे हा निर्णय लांबवणीवर पडणार, असे दिसत आहे. यामुळे बळीराजाला कर्जमाफीसाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे.



विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यास शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीत अडचणीची शक्यता वर्तविली जात आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत महापालिकांचे सर्व नगरसेवक, नगरपालिका, नगरपंचायतींचे अध्यक्ष आणि नगरसेवक, जिल्हा परिषदेचे सदस्य, सर्व स्वीकृत सदस्य आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सदस्य असतात. सर्वसामान्य मतदार नसल्याने सरकारकडून कर्जमाफीचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी सूत्रांची माहिती आहे

मात्र, सर्वसामान्यपणे असे मोठे निर्णय घेण्याचे टाळले जाते, असं तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अशात, राज्य सरकारकडून शेतकरी कर्जमाफीसंदर्भात काय प्रक्रिया पुढे केली जाते आहे हे बघणे महत्त्वाचे ठरेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जूनअखेरपर्यंत कर्जमाफी जाहीर करण्याचे संकेत दिले होते. राज्यातील ३५ ते ४० लाख शेतकऱ्यांना लाभ मिळण्याची शक्यता आहे. सुमारे २७ हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार राज्य सरकारवर पडणार आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या थकीत पीककर्जावर दोन लाखांपर्यंत माफी प्रस्तावित आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या २० लाख शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे. आचारसंहिता संपल्यानंतरच मंत्रिमंडळात प्रस्तावावर निर्णय अपेक्षित असल्याची माहिती आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आता नव्या राजकीय रणनीतीसाठी मोठे पाऊल उचलण्याच्या तयारीत



**मुंबई (प्रतिनिधी)**– राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आता नव्या राजकीय रणनीतीसाठी मोठे पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. पक्षाकडून 'डिझाईन बॉक्स'नंतर आता I-PC या संस्थेची नियुक्ती केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. यासाठी प्रसिद्ध राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्याशी चर्चा झाली असल्याची माहिती समोर आली आहे.

सोमवारी सकाळी जवळपास दोन तासांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार आणि प्रशांत किशोर सहभागी झाले होते, अशी माहिती मिळत आहे. तसेच बैठकीनंतर आवश्यक सोपस्कार पूर्ण करण्यात आले असून, पुढील दोन दिवसांत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याची माहिती आहे. त्यानंतर प्रशांत किशोर अधिकृतपणे राष्ट्रवादी काँग्रेससाठी काम सुरू करणार असल्याचे सांगितले जात आहे.

**१ जूनपासून प्रशांत किशोर सक्रिय होणार**

मिळालेल्या माहितीनुसार, १ जूनपासून प्रशांत किशोर हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रणनीतीकार म्हणून सक्रिय होणार आहे. पक्षाची प्रतिमा मजबूत करणे, सोशल मीडिया मोहिमा, मतदारांशी संवाद वाढवणे आणि बुथस्तरावर संघटन मजबूत करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

राजकीय वर्तुळात या घडामोडींना विशेष महत्त्व दिले जात आहे. कारण देशातील अनेक राज्यांमध्ये निवडणुकीत यशस्वी रणनीती आखण्यात I-PC भूमिका महत्त्वाची राहिली आहे. त्यामुळे आता महाराष्ट्रातही या कंपनीच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस आपली राजकीय ताकद वाढवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे मानले जात आहे.

# लग्नाला नकार दिला म्हणून प्रसिद्ध गायिकेची हत्या



**मुंबई (प्रतिनिधी)** –एका प्रसिद्ध गायिकेचं अपहरण करून ६ दिवसांनी तिची अमानुष हत्या करण्यात आली आहे. या बातमीनंतर देशभरातून संताप व्यक्त केला जात आहे.

ही गायिका आहे पंजाबी म्युझिक इंडस्ट्रीतील प्रसिद्ध इंदर कौर उर्फ यशइंदर कौर. ६ दिवसांपूर्वी बंदुकीचा धाक दाखवून तिचे अपहरण करण्यात आले होते. अखेर तिचा मृतदेह नीलो कालव्यात आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. या बातमीने तिच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

इंदरचा भाऊ जोतइंदर यांनी पोलिसांकडे दाखल केलेल्या तक्रारीनुसार, १३ मे रोजी इंदर रात्र साडेआठच्या सुमारास तिच्या कारमधून रेशन आणण्यासाठी बाजारात निघाली होती. मात्र, रात्र झाली, तरी ती घरी परतलीच नाही. कुटुंबीयांनी तिचा सर्वत्र शोध घेतला. पण ती कुठेही सापडली नाही.

अशातच, मोगा येथील भलूर गावातील सुखविंदर सिंह उर्फ सुक्खा याच्यावर त्यांचा संशय गेला. सुखविंदरला इंदरशी जबरदस्ती लग्न करायचं होतं, पण इंदरने त्याला स्पष्ट नकार दिला होता. याच नकाराचा राग मनात धरून सुखविंदरने तिच्या किडनॅपिंगचा प्लॅन आखला.

समोर आलेल्या माहितीनुसार, सुखविंदर सिंह केवळ इंदरला लग्नासाठी धमकावण्यासाठी तो थेट कॅनडाहून पंजाबला आला होता. १३ मेला त्याने काही गुंडांच्या साथीने इंदरची गाडी रस्त्यात अडवली. बंदुकीचा धाक दाखवून तिचं अपहरण केलं आणि नंतर तिची हत्या करून पुरावे नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह कालव्यात फेकून दिला.

धक्कादायक गोष्ट म्हणजे, इंदरची हत्या केल्यानंतर सुखविंदर कॅनडाला पळून गेला आहे. दरम्यान, इंदरच्या तपासावरून कुटुंबियांनी पंजाब पोलिसांच्या कार्यपद्धतीवरून संताप व्यक्त केला आहे.

१५ मे रोजीच मुख्य आरोपी सुखविंदर आणि त्याचा साथीदार करमजीत सिंह यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी जर वेळीच हालचाल केली असती, तर आज इंदर जिवंत असती, असा आरोप कुटुंबाने केला आहे.

सध्या जमालपुर ठाण्याचे पोलीस अधिकारी बलबीर सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा दाखल झाला असून फरार आरोपींना पकडण्यासाठी आणि कॅनडा गेलेल्या मुख्य आरोपीला भारतात परत आणण्यासाठी कायदेशीर हालचाली सुरू आहेत.

# विधान परिषदेच्या १७ जागांसाठी रणसंग्राम; संख्याबळामुळे महायुतीचे पारडे जड!



**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ मतदारसंघांमधून विधान परिषदेवर निवडून द्यावयाच्या जागांची निवडणूक १८ जून रोजी पार पडणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने सोमवारी या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. या विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळेल तर महाविकास आघाडीला जिंकण्यासाठी बराच संघर्ष करावा लागणार असल्याचं चित्र संख्याबळावरून दिसत आहे.

यापैकी १६ जागांसाठीची निवडणूक तर नागपूर स्थानिक स्वराज्य संस्थेची एक पोटनिवडणूक होणार आहे. नागपूरमध्ये भाजपचे नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेवर निवडून गेल्याने विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा राजीनामा २३ नोव्हेंबर २०२४ रोजी दिला होता. बावनकुळे यांच्या या जागेचा कार्यकाळ १ जानेवारी २०२८ पर्यंत आहे. त्यामुळे बावनकुळेंच्या जागेवर निवडून येणाऱ्या आमदाराला दीड वर्षासाठीच आमदारकी मिळणार आहे. अन्य १६ जणांना ६ वर्षाचा कार्यकाळ मिळेल. अलीकडच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळाल्याने या निवडणुकीत महायुतीचेच वर्चस्व दिसून येईल.

या निवडणुकीसाठीचे मतदार हे महापालिकांचे सर्व नगरसेवक, नगरपालिका, नगरपंचायतींचे अध्यक्ष आणि नगरसेवक, जिल्हा परिषदांचे सदस्य, सर्व स्वीकृत सदस्य, कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सदस्य असतात.

**या ठिकाणी होणार निवडणूक**

१) पुणे २) अहिल्यानगर ३) ठाणे ४) जळगाव ५) सांगली–सातारा ६) नांदेड ७) यवतमाळ ८) सोलापूर ९) भंडारा–गोंदिया १०) रायगड–रत्नागिरी–सिंधुदुर्ग ११) नाशिक १२) वर्धा–चंद्रपूर–गडचिरोली १३) अमरावती १४) धाराशिव–लातूर–बीड १५) परभणी–हिंगोली १६) छत्रपती संभाजीनगर – जालना १७) नागपूर (पोटनिवडणूक)

**निवडणूक कार्यक्रम जाहीर**

अधिसूचना जारी : २५ मे

अर्ज भरण्याची शेवटची तारीख : १ जून

अर्जाची छाननी : २ जून

अर्ज माघारीची शेवटची तारीख : ४ जून

मतदान : १८ जून – स. ८ ते दु. ४.

मतमोजणी : २२ जून

विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पुण्याच्या जागेवरुन राष्ट्रवादी आणि भाजपमधे रस्सीखेच पहायला मिळू शकते. पुण्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधे निवडून आलेल्या प्रतिनिधींचं बलाबल पाहता राष्ट्रवादी काँग्रेसकडे ३४४ तर भाजपकडे ३०६ इतके प्रतिनिधी आहेत. महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडे ६८, काँग्रेसकडे १९, शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडे १७ तर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडे ११ सदस्य आहेत. त्यामुळे सर्वात जास्त सदस्य असल्याने राष्ट्रवादीने या जागेवर दावा केला. मात्र त्यावर भाजप काय निर्णय घेणार हे पहावे लागणार आहे.

# नदीजोड प्रकल्पांची कामे कालमर्यादेत पूर्ण करा –ना. राधाकृष्ण विखे पाटील

**मुंबई (प्रतिनिधी)**–राज्यातील महत्त्वाच्या नदीजोड प्रकल्पांची कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

कोकण–गोदावरी, दमणगंगा–वैतरणा–गोदावरी, दमणगंगा–एकदरे–गोदावरी तसेच कोकण–गोदावरी वळण योजना या नदीजोड प्रकल्पांचा सविस्तर आढावा मंत्री विखे पाटील यांनी आज घेतला.आयोजित बैठकीमध्ये प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेताना मंत्री विखे पाटील यांनी कामांची गती वाढवून प्रत्येक टप्प्यासाठी निश्चित कालमर्यादा ठरविण्याचे निर्देश दिले. राज्याच्या दीर्घकालीन जल व्यवस्थापनासाठी तसेच दुष्काळग्रस्त भागांना दिलासा देण्यासाठी हे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात प्रस्तावित हा प्रकल्प दमणगंगा आणि वैतरणा उपखोऱ्यातील अतिरिक्त उपलब्ध पाणी उर्ध्व गोदावरी उपखोऱ्यात वळविण्यासाठी राबविण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे नाशिक जिल्ह्यातील अवर्षणप्रवण सिन्नर तालुक्यास सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

# येवला वन विभागाचे ८ कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात; प्रशासकीय विभागात खळबळ




**नाशिक (प्रतिनिधी)** – लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने नाशिक जिल्ह्यातील येवला वनविभागाच्या कार्यालयात छापा टाकला. लाच घेणाऱ्या ८ कर्मचाऱ्यांना एसीबीच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. या घटनेने नाशिक प्रशासकीय विभागात खळबळ उडाली आहे.

नाशिक जिल्ह्यातील प्रशासकीय विभागात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले आहेत. वाढलेल्या या भ्रष्टाचाराचा नायनाट करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कठोर कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. दोन दिवसांपूर्वीच पिंपळगाव बसवंत येथील हवालदाराला ५ हजारांची लाच घेतल्या प्रकरणी अटक करण्यात आली होती. आता येवला वन विभागाच्या कार्यालयातील ८ कर्मचाऱ्यांना एसीबीने ताब्यात घेतले आहे.

हाती आलेल्या माहितीनुसार वन विभागाच्या कार्यालयातील ८ कर्मचाऱ्यांनी सागाची झाडे तोडण्याची परवानगी देण्यासाठी लाच मागितली होती. या प्रकरणी नाशिक एसीबीकडे तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर एसीबी पथकाने कारवाई करीत ८ कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतले आहे. येवला वन विभागाच्या कार्यालया एसीबीच्या पथकाने छापा मारल्याने प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

पोलीस निरीक्षक पुनम केदार यांच्या नेतृत्त्वाखालील पथकाने ही कारवाई केली असून, या प्रकरणाचा तपास सुरू आहे. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी नेमकी किती रुपयांची लाच मागितली होती याची माहिती अद्याप मिळू शकली नाही. कारवाई पूर्ण झाल्यावरच त्याबाबत अधिकृत माहिती हाती येईल.


## Change In Name

**My old Name is KHAIRUNNISA BEGUM AHEMAD BAIG MOGALwhich now I am Changing as New Name KHAIRUNISA BEGUM AHMED BAIG MOGAL Hence forth My All Correspondence will be done as Per my new name. Please consider the same. Sign by-KHAIRUNISA BEGUM AHMED BAIG MOGAL Address: H/N 173 Ward No 03 Opp Masjid At Post Talegaon Umri 431807**

**Mo. No. 9423139549**

## मूळ विक्रीपत्र गहाळ झाले बाबत

खालील वर्णनाचे मूळ विक्रीपत्र बजाजनगर ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान गहाळ झाले आहे.

लिहून घेणार : भगवानराव जि. विश्वनाथराव पांगरकर, रा. नांदेड – लिहुन देणार : नारायणदास मथुरादास बजाज, रा. नांदेड

मूळ खरेदीखत ग्रा.पं. मौ. नसरतपूर पैकी मौ. जंगमवाडी येथील स.नं. ६/ए पैकी एक प्लॉट ज्यांचा प्लॉट नं. २४ असलेले मूळ खरेदी खत (मूळ रजिस्ट्री) हे आम्ही खालील सही आम्ही दोघे आमचे रहाते घर बजाज नगर ते जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड दिनांक १८/०५/२०२६ रोजी दुपारी ३ ते ४ वाजताच्या दरम्यान दुचाकीने प्रवास करत असताना गहाळ झालेले आहे. ज्यांना सापडले असेल त्यांनी आणून देणे योग्य बक्षीस देण्यात येईल. संपर्क–राजेश भ. पांगरकर ९९२२८७४२१६, संदीप भ. पांगरकर ९६०४०३५३०५ रा. बजाज नगर, दत्तमंदिराजवळ, नांदेड.

## Change In Name

My old name is **LAVANYA ALUPULA** Which now I am Changing as new Name **LAVANYA ALPULA** Hence forth my all correspondence Will be done as per my new name. Please consider, the same. **Address-H. No. 6-14-160/2 CanalKatta Namdewada Nizamabad**

**Mo. No. 7893707088**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८



## नोकरीची सुवर्णसंधी

Confectionery, गोळी–बिस्कीट, मिठा पान चटणी, किराणा व पान शॉपच्या वस्तूंच्या मार्केटिंगसाठी मेहनती, हुशार व सुशिक्षित मुलांची आवश्यकता आहे.

**कामाचे ठिकाण:** नांदेड शहर व जिल्हा, **पगार:** १५,००० ते१८,००० रुपयांपर्यंत. व्यवसायावर आकर्षक बोनस देखील दिला जाईल. उमेदवाराकडे स्वतःचे टू–व्हीलर असणे आवश्यक. इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा: फ्रेंड्स जर्दा स्टोअर जुना मोंढा, नांदेड. मोबाईल: ८६८८९६९७५५

## Change In Name

My old name is **REKHA** Which now I am Changing as new Name **REKHA BHIMRAO DESHMUKH** Hence forth my all correspondence Will be done as per my new name. Please consider, the same. **Sign By -REKHA BHIMRAO DESHMUKH 69, At. Post. Pimpalgaon Mahadev Tq. Ardhapur, Dist. Nanded(MS)-431704**

**Mo. No. 7756860436**

## Change In Name

My old name is **HAJI S. NOOR SYED** Which now I am Changing as new Name **SYED HAJI** Hence forth my all correspondence Will be done as per my new name. Please consider, the same. **Address-5-3-309 Gadipura, Nanded Itwara, Nanded-431604**

**Mo. No. 9765348105**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या द्वारे कळविण्यात येते की, शहर नांदेड ता. जि. नांदेड येथील मिळकत ज्याचा नगर भूमापन क्र. १७६५ क्षेत्रफळ ७०.१० चौरस मीटर असून, या मिळकत पत्रिकेवरील धारक श्री भागवत पि. प्रल्हादराव वट्टमवार हे आहेत. अर्जदार श्रीनिवास भागवत वट्टमवार यांनी या मिळकत पत्रिकेवरील धारकाचे नाव कमी करून मृत्यूपत्राआधारे मिळकत पत्रिकेवर १. श्रीकांत भागवत वट्टमवार व श्रीनिवास भागवत वट्टमवार यांचे नावे नामांतर करणे कामी उपअधीक्षक भूमिअभिलेख नांदेड यांच्या कार्यालयात नामांतर अर्ज दाखल केला आहे. तरी सदर मिळकतीबाबत/नामांतराबाबत कोणाचा हक्क, उजर, आक्षेप असेल तर सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत आपले आक्षेप वरील कार्यालयात दाखल करावेत. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मिळकत पत्रिकेवर नामांतराची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

उपअधीक्षक भूमिअभिलेख
नांदेड

## नावात बदल

माझे जुने नाव – फौजिया फातेमा शेख एहेसान असे असून, माझे नाव बदलून नवीन नाव– फौजिया फातेमा असे करण्यात आले आहे. व वरील नावाची मी एकमेव व्यक्ती आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

संपर्क पत्ता–फौजिया फातेमा
घर नं. १–७–१८१३ गल्ली नं. १८
पीर बुऱ्हाण नगर, तरोडा बु. नांदेड–४३१६०५ महाराष्ट्र
मो. नं. ८४२१३३३३२९

## Change In Name

My old name is **ALUPULA GANGADHAR** Which now I am Changing as new Name **ALPULA GANGADHAR** Hence forth my all correspondence Will be done as per my new name. Please consider, the same. **Address-H. No. 6-14-160/2 CanalKatta Namdewada Nizamabad Mo. No. 7893707088**

## Change In Name

My old name is **SHAIKH YAKUBALI AHMADALI** Which now I am Changing as new Name **SHAIKH YAKHUB AHEMADALI** Hence forth my all correspondence Will be done as per my new name. Please consider, the same. **Address-At. Post MALKAUTHA Tq. Mudkhed, Dist. Nanded Maharashtra-431806 Mo. No. 9765348105**

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## नीट, महागाई व कांदा दरावरून काँग्रेसची सरकारवर टीका

### जिल्हाध्यक्ष राजेश पावडे यांच्या नेतृत्वात काँग्रेसचे निवेदन







**नांदेड (प्रतिनिधी)** – नीट पेपरफुटीमुळे विद्यार्थी वर्गात असुरक्षिततेचे वातावरण आहे. पेट्रोल, डिझेल दरवाढीमुळे महागाई वाढत आहे तर दुसरीकडे खाद्यतेलाच्या दरवाढीमुळे जेवण महाग होत आहे, त्यात कांद्याला भाव मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. सर्वत्र असंतोषाचे व असुरक्षिततेचे वातावरण असल्याची टीका करीत तत्काळ यावर तोडगा काढावा, अशी मागणी काँग्रेस उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे यांच्या नेतृत्वात नांदेड काँग्रेसने केली आहे. दरम्यान त्यांच्या नेतृत्वात सदर मागण्यांचे निवेदन काँग्रेसच्या वतीने मंगळवार दि.१९ मे रोजी देण्यात आले.

नीट परीक्षेतील सर्व गैरप्रकाराची निष्पक्ष चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा. दोषी कोचिंग क्लासेस चालकांकडून संबंधित विद्यार्थ्यांचे संपूर्ण कोचिंग शुल्क वसूल करून विद्यार्थ्यांना परत द्यावेत. पेट्रोल, डिझेल व खाद्यतेलाचे वाढलेले दरवाढ कमी करून नागरिकांना दिलासा द्यावा. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव व योग्य बाजारभाव मिळवून द्यावा. कांदा खरेदी केंद्र सुरू करुन अनुदान जाहीर करावे, अशी मागणी यावेळी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, सुरेशदादा गायकवाड, डॉ. श्रावण रॅपनवाड, सुरेंद्र घोडजकर, एकनाथ उर्फ अनिल मोरे, डॉ. रेखा चव्हाण, बालाजी गाडे पाटील, केदार पाटील साळुंखे, आनंद चव्हाण, महेश देशमुख तरोडेकर, बालाजी चव्हाण, रमेश चित्ते, अब्दुल गफार, सत्यपाल सावंत, मुन्ना अब्बास, रमेश गोडबोले, आनंद कल्याणकर, गोविंदबाबा गोंड, कुमार कुर्तडीकर, अजिज कुरेशी, शेर अली, सुरेश हटकर, दीपकसिंग हुजुरीया, गगन यादव, संजय वाघमारे, बापूसाहेब पाटील, अतुल पेदेवाड, माधवराव पवळे, गणेश ढगे, ज्योती कदम, अब्दुल फईम, अंबादास रातोळे, गौतम सिरसाट, गोविंद पाटील, नागराज सुलगेकर, शुद्धोधन सावंत, संजय कौठेकर, शामराव पाटील मनाठकर, गंगाधर आडेराव, शेख मुख्तार, अझर शेख, प्रकाश दिपके आदींसह इतर पदाधिकारी व काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खतांसाठी शेतकरी रांगेत; नायगावात युरिया-डीएपीचा काळाबाजार तेजीत

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – खरीप हंगाम तोंडावर येताच नायगाव तालुक्यात युरिया व डीएपी खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत असून, काही खत विक्रेत्यांकडून शासन दरापेक्षा जादा दराने खत विक्री केली जात असल्याच्या तक्रारींनी जोर धरला आहे. शेतकऱ्यांना आवश्यक असलेले युरिया व डीएपी खत सहज उपलब्ध होत नसल्याने अनेक गावांतील शेतकऱ्यांना पहाटेपासून खत दुकानांसमोर रांगा लावाव्या लागत आहेत.





तालुक्यातील अनेक खत विक्रेत्यांकडून खत उपलब्ध नाही असे सांगितले जात असले तरी मागच्या दाराने जादा दराने विक्री होत असल्याचा आरोप शेतकरी वर्गातून केला जात आहे. काही ठिकाणी खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना अनावश्यक औषधे, सूक्ष्म अन्नद्रव्ये किंवा इतर कृषी साहित्य घेण्याची सक्ती केली जात असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक पैसे आकारून उघडपणे काळाबाजार सुरू असल्याची चर्चा ग्रामीण भागात सुरू आहे.

विशेष म्हणजे, कृषी विभागाकडून वेळोवेळी तपासण्या व कारवाईचे दावे केले जात असले तरी प्रत्यक्ष परिस्थितीत कोणताही बदल दिसून येत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. कारवाईचा केवळ दिखावा केला जातो, मात्र दोषी विक्रेत्यांवर ठोस कारवाई होत नाही, असा आरोप शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे.

तालुक्यातील अनेक गावांमधून खत टंचाई व काळाबाजाराबाबत तक्रारी वाढत असताना संबंधित कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून अचानक छापेमारी मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे. संशयित खत विक्रेत्यांकडे विभागाने एखादा 'डमी ग्राहक' अथवा फंटर पाठवून प्रत्यक्ष व्यवहाराची शहानिशा करावी आणि शासन नियमांचे उल्लंघन करत जादा दराने खत विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरीवर्गातून जोर धरत आहे.

याशिवाय दोषी आढळणाऱ्या विक्रेत्यांचे परवाने तत्काळ निलंबित अथवा रद्द करावेत, तसेच अशा विक्रेत्यांची नावे जाहीर करून इतरांनाही धडा शिकवावा, अशी मागणी होत आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेत व योग्य दरात खत उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असून, कृषी विभागाने निष्क्रियता झटकून तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## तरोडा बुद्रुक भागात विजेचा खेळखंडोबा

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील तरोडा बुद्रुक, चैतन्य नगर, शिवविजय कॉलनी, संभाजीनगर, नेहरूनगर अशा अनेक नगरांनी बनलेल्या या भागात उन्हाळ्याचे दिवस असताना रोज दुपारी रात्री व कधीही अचानकपणे वीज पुरवठा खंडित होत आहे.

संबंधित एमएसईबीच्या अधिकाऱ्यांना फोन केला तर उचलतच नाहीत किंवा काम चालू आहे अशी जुजबी उत्तरे देतात. पण आज तर कहरच झाला. मंगळवारी पहाटे ४ वाजता नळाला पाणी आले. आधीच चार चार, पाच पाच दिवस नळाला पाणी येत नाही. त्यात नळाला पाणी आलेले असताना लाईट गेली. त्यामुळे अनेक घरांना पाण्यावाचून वंचित राहावे लागले. लाईट जाण्याचे खरे कारण पाहिले असता ते एमएसईबीकडे नसून महानगरपालिकेकडे जाते. कारण महानगरपालिकेने रस्त्यावर लावलेली जी झाडे आहेत त्याच्या फांद्या एमएसईबीच्या लाईनवर पडतात, आणि त्यामुळे स्पार्किंग होऊन डीपीमध्ये फॉल्ट निर्माण होतो आणि वीज जाते. त्यामुळे दोघांमध्ये समन्वय राहिलेला दिसत नाही. तरी सर्व नागरिकांकडून मंगळवारी तरोड्याच्या एमएससीबीमध्ये अर्ज देण्यात आला. त्यावर अनेक नागरिकांच्या सह्या आहेत. नागरिकांची ही समस्या महानगरपालिका आणि एमएसईबी या दोघांनी मिळून लवकरात लवकर सोडवावी अशी मागणी करण्यात येत आहे.

या निवेदनावर परिसरातील पारटकर, जाधव, कुलकर्णी, कुंटूरकर, देशमुख, मोतेवार तसेच अनेक नागरिकांच्या सह्या आहेत.

## पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाकडून कुंटूर येथील हुस्सा वाळू घाटावर छापा

### अवैध व्यवसाय विरोधी मोहिमेदरम्यान ६४ गुन्हे दाखल, ७५ इसमांविरुद्ध कारवाई, ३ कोटींचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)**– दि. १ ते ३१ मे दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. या सततच्या धडक कारवाईमुळे अवैध धंदेचालकांचे धाबे दणाणले आहेत.

या मोहिमेच्या १८ व्या दिवशी पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या अधिपत्याखालील पथकाने नांदेड जिल्ह्यातील कुंटूर पोलीस ठाणे हद्दीत मौजे हुस्सा येथील वाळू घाटावर धाड टाकून ५ हायवा, एक टिप्पर, जेसीबी मशीन, इंजिन बोट व ५० ब्रास वाळू असा २ कोटी ३६ लाख ५० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमूद



प्रकरणी पोलिसांनी १० आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सोमवारी दिवसभरात नांदेड परिक्षेत्रात मटका-जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण २१ इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत १५ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून २ लाख ५१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे अवैध दारू विक्री करणाऱ्या ३७ इसमांविरुद्ध ३७ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून २ लाख २७ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्धही अन्य २ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून २५ लाख ३२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त कारवाई सोबतच, शस्त्र अधिनियमान्वये १, कोटपा अन्वये २, तर इतर अधिनियमाखाली मिळून एकूण ६४ कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण ३ कोटी १० लाख २१ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी या दृष्टिकोनातून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली असून, सदर हेल्पलाइनला नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत आहे.

## रत्नाकर पांडे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**– तामसा येथील ज्येष्ठ नागरिक रत्नाकर बळवंतराव पांडे (वय ७७) यांचे दीर्घ आजारामुळे दि. १८ मे रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर तामसा येथील स्मशानभूमीत दि.१९ रोजी सकाळी तामसा अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मेडिकल व्यावसायिक गजानन पांडे यांचे ते वडील होत.

## अर्धापूर तालुक्यातील कामठा (बु.) येथे शेतकऱ्याचा खून

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील कामठा बु. येथील शेतकरी घराच्या समोर बाजेवर झोपले असताना त्यांच्या डोक्यात अज्ञाताने गंभीर वार केल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे. ही घटना मंगळवार, दि. १८ मे रोजी मध्यरात्री २.३० ते ५ च्या दरम्यान घडली.

कामठा येथील शेतकरी प्रल्हाद राजाराम कल्याणकर (वय ५६ वर्ष) यांनी अंगणात गहू वाळू घातले होते. रात्रीला गव्हाची जागल करण्यासाठी अंगणात झोपले होते. त्यांच्या कानाच्या वर डोक्याला जबर वार करून गंभीर जखमी





केल्याने शेतकरी जागीच ठार झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधिक्षका अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजन यांनी भेट देऊन पोलीस निरीक्षक चंद्रकांत कदम यांना तपास करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या खून प्रकरणातील संशयीताचा शोध घेण्यासाठी सहायक पोलीस निरीक्षक विष्णुपंत कराळे, सपोनि.चितरंजन ढेमकेवाड, पोउनि. सुरेश भोसले, जमादार पप्पू चव्हाण, कार्तीकुमार रणवीरकर, संभाजी गौरकर, बालाजी चाटे, आर.एस. नरवाडे, संभाजी शिवभक्त, सुभाष मुंगल, संतोष काळे, इंदुताई गवळी या खून प्रकरणाची सर्व बाजूंनी चौकशी करून आरोपींना लवकरच अटक करू अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

या खूनप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती

## गंगाधर नरवाडे यांचे निधन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत खाजगी कंत्राटी व्यवस्थापना-वरील पुरूष मजूर गंगाधर नरवाडे यांचे हृदयविकाराने सिडको परिसरातील निवासस्थानी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा दोन मुली असा परिवार आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून सिडको परिसरातील अनेक भागात नरवाडे मामा या नावाने ते परिचित होते.

## स्क्रिन टू स्किल चर्चासत्राचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– शालेय विद्यार्थ्यांमधील वाढत्या मोबाईल वापराचे व्यसन बालवयातील अनेक मानसिक व शारीरिक व्याधींचे मूळ बनत आहे. विद्यार्थ्यांना स्क्रिनऐवजी सकारात्मक स्किलची आवड निर्माण व्हावी यासाठी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ सचिन जोशी, प्रा. डॉ. नामदेव दळवी व प्रा. व्यंकट कोनाळे यांच्यासह अनुभवी मानसोपचारतज्ज्ञांच्या सुसंवादातून लाईफ स्किल कोच इंजि. शिवाजीराजे पाटील यांनी तयार केलेल्या स्क्रिन टू स्किल या पालक-समुपदेशक संयुक्त चर्चासत्राचे आयोजन खास किशोरवयीन मुलांच्या पालकांसाठी सोमवार, दि. २५ मे रोजी दुपारी ४ वाजता विष्णुपुरी येथील काळेश्वर सभागृहात करण्यात आले असल्याची माहिती प्रा. साहेबराव देशमुख यांनी दिली.

मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम अत्यंत घातक ठरत आहेत. मुलांना मोबाईलचे व्यसन लागण्याआधीच पालकांनी प्रसंगी कठोर भूमिका घेत वेळीच सावध होणे आवश्यक आहे. बालवयात मुलांना स्क्रीनऐवजी महापुरुषांचे चरित्र वाचन, मैदानी खेळ, योगा, प्राणायाम, विपश्यना, ध्यान, इत्यादी छंद जोपासून मोबाईल स्क्रिनला सक्षम, सकारात्मक व कौशल्य विकसित करणारे पर्याय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने इंटरनॅशनल माईंड पॉवर ट्रेनर शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी या विशेष कार्यक्रमाची निर्मिती केली आहे. या कार्यक्रमाचा पालकांनी आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजक इंजि. मनोज देशमुख बारडकर, अशोक हंबर्डे व प्रा. दिलीप पाटील यांनी केले आहे.

## नांदेड आकाशवाणीची क्षमता वाढवून जिल्ह्यात एफएम प्रसारण सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून द्या : खा. गोपछडे यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड आकाशवाणी केंद्रातील तांत्रिक अडचणी दूर करून केंद्राची प्रसारण क्षमता वाढविण्यासह पूर्वीप्रमाणे सायंकालीन प्रसारण पुन्हा सुरू करण्यात यावेत, तसेच नांदेड एफएम केंद्राचे क्षमतावर्धन करून संपूर्ण नांदेड जिल्ह्यात एफएम प्रसारण सुविधा स्पष्ट आणि प्रभावीपणे उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी राज्यसभेचे खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.



या संदर्भात खा. डॉ. अजित गोपछडे यांनी नवी दिल्ली येथे माहिती व प्रसारण तसेच संसदीय कार्य राज्यमंत्री एल. मुरुगन यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले. यावेळी नांदेड जिल्ह्यातील कला, संस्कृती आणि ग्रामीण कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी त्यांनी केली. मंत्री महोदयांनीही या मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली आहे.

या पत्रात खा. डॉ. गोपछडे यांनी नमूद केले आहे की, नांदेड आकाशवाणी केंद्र अनेक वर्षांपासून स्थानिक शहरी व ग्रामीण भागातील कलाकारांना मंच उपलब्ध करून देत आहे. विशेषतः कीर्तन, भजन आणि लोककला यांसारख्या पारंपरिक कला प्रकारांना आकाशवाणीच्या माध्यमातून मोठे प्रोत्साहन मिळत होते. शिवाय शेतकऱ्यांसाठीही प्रेरणादायी कार्यक्रम प्रसारित करण्यात येत होते. मात्र सध्या तांत्रिक अडचणींमुळे सायंकालीन कार्यक्रम बंद झाले आहेत. त्यामुळे नांदेड आकाशवाणी केंद्र अधिक सक्षम करून त्याची प्रसारण क्षमता वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच नांदेड एफएम केंद्राची प्रसारण क्षमता मर्यादित असल्याने जिल्ह्यातील अनेक ग्रामीण आणि सीमा भागांमध्ये एफएम सेवा स्पष्टपणे पोहोचत नसल्याचे त्यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. नांदेड एफएम केंद्राचे क्षमतावर्धन झाल्यास संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना माहिती, मनोरंजन, शैक्षणिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचा मोठा लाभ होईल, असेही ते म्हणाले.

## नांदेडमध्ये 'प्लास्टिक मुक्ती' केवळ कागदावरच!

### मनपा आयुक्तांच्या 'ॲक्शन मोड'ची गरज

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)**– गोदावरी नदीच्या कुशीत वसलेले ऐतिहासिक आणि व्यापारी केंद्र असलेले नांदेड शहर सध्या प्लास्टिक कचऱ्याच्या भस्मासुरामुळे गुदमरले आहे. शासनाने ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या आणि 'सिंगल-युज प्लास्टिक'वर पूर्णपणे बंदी घातलेली असली, तरी शहरात मात्र याचा सर्रास आणि राजरोसपणे वापर सुरू आहे. महापालिकेची कारवाई थंड बस्त्यात पडल्याने नांदेड प्लास्टिकमुक्त ही घोषणा केवळ कागदावरच उरल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठा, जुना मोंढा, इतवारा, सिडको परिसर आणि भाजी मंडईमध्ये प्लास्टिक पिशव्यांचा अनिर्बंध वापर सुरू आहे. भाजी विक्रेते, किराणा दुकानदार, आणि हॉटेल्समधून ग्राहकांना राजरोसपणे प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या दिल्या जात आहेत.

महापालिकेच्या वतीने काही काळापूर्वी विशेष जप्ती पथके नेमून जुना मोंढा किंवा मॉल्सवर कारवाया करण्यात आल्या होत्या. मात्र, या कारवाया सातत्यपूर्ण नसल्यामुळे व्यापाऱ्यांवर त्याचा वचक राहिलेला नाही. काही दिवस मोहीम राबवून नंतर ती थंड पाडली जाते, ज्यामुळे ही मोहीम केवळ 'फोटोसेशन' आणि प्रसिद्धीपुरतीच मर्यादित असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमी आणि नागरिक करत आहेत.

**नाल्यांमध्ये अडथळे :** शहरातील कचरा कुंड्या ओसंडून वाहत असून उघड्या नाले आणि गटारांमध्ये प्लास्टिक अडकल्याने पाण्याचा निचरा होत नाही.

**गोदावरी नदीचे प्रदूषण :** कचऱ्यातील मोठा प्लास्टिकचा भाग थेट गोदावरी नदीच्या पात्रात जात असल्याने नदीचे पाणी प्रदूषित होत असून जलचरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

**आरोग्याला धोका :** प्लास्टिक कचरा उघड्यावर जाळला जात असल्यामुळे शहरात विषारी वायू हवेत पसरत असून, नागरिकांमध्ये श्वसनाचे विकार बळावत आहेत.



**महापालिका आयुक्तांनी लक्ष देण्याची गरज**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी या प्रकरणात थेट हस्तक्षेप करून मोहीम अधिक तीव्र करण्याची गरज आहे. केवळ लहान व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई न करता प्लास्टिकचा पुरवठा करणाऱ्या मुख्य गोदामांवर थेट छापे टाकून गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी केली जात आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com